दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ५ वे अंक -२१० गुरुवार,दि.०३ एप्रिल २०२५ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४
Beed Daily Marathi Year-5th Issue-210 Thursday, Dt.03 April 2025 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4



बीड – येथील दैनिक लोकाशाच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे आयुष्यमान मिशन भारत अध्यक्ष देवदूत डॉ.ओमप्रकाश शेटे साहेब यांचा संपत्निक सत्कार करताना राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजितदादा पवार साहेब व कॅबिनेट मंत्री पंकजाताई मुंडे साहेब यासह इतर अनेक मान्यवर.

# सामाजिक आणि राजकीय सलोखा राखत विमानतळ, रेल्वे, तारांकित एमआयडीसी सह विकासाचे प्रकल्प राबवून बीड जिल्ह्याचा चेहरा बदलणार !

## विकासकामासाठी निधी कमी पडू देणार नाही, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित दादा पवार यांची बीडकरांना ग्वाही



### अंबाजोगाईच्या वैद्यकीय महाविद्यालयाला सर्वतोपरी सहकार्य...

अंबाजोगाई येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला येत्या वर्षात ५० वर्ष पुर्ण होत असल्याचे निमित्त साधून महत्त्वाच्या कामासाठी आवश्यक निधी शासन स्तरावरून देण्यात येईल. बीड सह लगत असलेल्या परभणी, लातूर व धाराशिव या चार जिल्हयातील रुग्णांची संख्या पाहता सर्व सुविधाही देण्यासाठी निधीची तरतूद करण्यात येणार असल्याचे उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी सांगितले.

### कालबद्ध निधी विनियोग...

यंदाच्या आर्थिक वर्षात नियोजनपूर्ण निधी विनियोग करण्याचे संकेत श्री. पवार यांनी दिले. लवकरच याबाबत बैठक घेऊन नियोजन निधीतील सर्व बाबी व यंत्रणा यांचा आढावा घेण्यात येणार असून तांत्रिक व प्रशासकीय मान्यता गतिमान पध्दतीने प्रदान करत डिसेंबर २०२५ पूर्वी निधी खर्च होईल तसेच काम दर्जेदार होईल, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले.




### आकर्षक असेल तारांगण...

एक उत्तम आणि अद्ययावत तारांगण उभारण्यात येणार आहे. यामध्ये सर्व जिल्हाभरातील शाळकरी मुलांना सहलीच्या माध्यमातून माहिती मिळावी हा या उभारणीचा हेतू आहे. बीड शहरात येणाऱ्या प्रत्येकासाठी एक उत्तम पर्यटन स्थळ देखील या तारांगणाच्या रूपाने उभे राहणार आहे. येथील आयटीआयच्या मोकळ्या जागेत २० कोटी रूपयांचा निधीतून तारांगण उभारण्याची योजना आहे. विद्यार्थ्यांनी बनविलेल्या विविध कलाकृती आणि जिल्हयातील प्रेक्षणीय स्थळांच्या प्रतिकृती ठेवण्याचे नियोजन आहे.

### मराठवाड्यातील पहिले कौशल्यवर्धन केंद्र

शहराच्या मध्यवर्ती भागात आय. टी. आय. च्या तीन एकर परिसरात कौशल्यवर्धन केंद्र उभारण्यात येणार आहे. टाटाच्या सहकार्याने हे केंद्र आकारास येईल. कंपनीतर्फे १६५.१० कोटी आणि एमआयडीसी कडून ३१.११ कोटी असे एकूण १९६.९८ कोटी खर्च करून याची उभारणी करण्यात येणार आहे. मराठवाड्यातील हे पहिले कौशल्यवर्धन केंद्र ठरणार आहे. याआधी विदर्भात चंद्रपूर आणि गडचिरोली व कोकणात रत्नागिरीत अशा केंद्राच्या कामाला सुरुवात झाली आहे.



### कामखेडा जवळ होणार बीडचे नवीन विमानतळ

विमानतळासाठी आवश्यक जागा बीड शहरापासून १४ किमी अंतरावर असलेल्या कामखेडा नजीक निश्चित करण्यात आली आहे. रेल्वे तसेच विमानतळ सेवा गतीने पुर्ण करण्यात येईल, विमातळाबाबतच्या भूसंपादनाची प्रक्रिया लवकरच सुरू करण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत या कामासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, असेही त्यांनी सांगितले.

### पोलीस प्रशासनाला आवश्यक असलेला १६ कोटी ३४ लाख रूपयांचा निधी तात्काळ मंजूर...

जिल्हयातील कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेत उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले, आपल्या जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था चांगली यासाठी पोलीस प्रशासनासोबतच आपल्या प्रत्येकाची ती जबाबदारी आहे. पोलीस प्रशासनाला आवश्यक असलेला निधी तातडीने देण्यात येईल. पायाभूत सुविधा, वाहने तसेच पोलीस स्टेशनमध्ये आवश्यक त्या बाबींची तातडीची गरज पुर्ण करण्यासाठी १६ कोटी ३४ लाख रूपयांचा निधी देण्यात येत असल्याचेही श्री. पवार म्हणाले. जिल्हयात यापुर्वी देण्यात आलेल्या शस्त्र परवान्याचीही पुन्हा पडताळणी करण्यात यावी. गरज तपासूनच शस्त्र परवाना देण्यात यावा,असे निर्देश त्यांनी यंत्रणेला दिले.

बीड / वैभव स्वामी

बीड जिल्हयातील विमानतळ, रेल्वे कामाची सद्यस्थिती, राष्ट्रीय महामार्ग, जिल्हा परिषदे अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना, शिक्षण विभागाचे नवोपक्रम, इनक्यूबेशन सेंटर तसेच तारांगण, विद्युत वितरण, जिल्हयात सुरू असलेल्या विविध विकास कामांना कुठेही निधी कमी पडू देणार नाही बीड जिल्हा पोलीस प्रशासनाने कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी केलेल्या मागण्यांना मी तात्काळ अर्थमंत्री म्हणून मान्यता दिलेली आहे त्यांच्या यापेक्षा ज्या अधिक मागण्या आहेत त्या देखील महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेब मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांच्याशी चर्चा करून मार्गी लावण्याचा प्रयत्न करणार आहे बीड जिल्ह्याचा मागास असलेला चेहरा बदलण्याचा माझ्या कार्यकाळात यशस्वी प्रयत्न करणार आहे एवढेच नव्हे तर बीड जिल्ह्यामध्ये सामाजिक आणि राजकीय सलोखा अबाधित ठेवण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन देखील महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांनी आढावा बैठकीनंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेमधून केले.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार हे अगदी दिलेल्या वेळेप्रमाणे बीडमध्ये सकाळी आठ वाजता आले रात्री नऊ वाजेपर्यंत त्यांनी बीड शहरामध्ये ज्या ज्या कार्यक्रमाला उपस्थित राहणार म्हणून शब्द दिला होता त्या सर्व कार्यक्रमांना त्यांनी उपस्थिती लावली त्याचबरोबर बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिकोनातून जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे विविध विभागांची व्यापक बैठक घेऊन आढावा घेतला ३१ मार्च अखेर पर्यंत महाराष्ट्र शासनाने बीड जिल्ह्याच्या विकासासाठी विविध विभागांना दिलेला निधी १००% खर्च झाला पाहिजे आणि झालेला खर्च हा संबंधित योजनेवरच झाला पाहिजे याचा देखील त्यांनी आपल्या स्टाईल मध्ये बीड जिल्ह्यातील अधिकाऱ्यांकडून आढावा बीड जिल्ह्याच्या विकासासंदर्भात मी कोणाचाही हस्तक्षेप खपवून घेणार नाही मग तो राजकीय असेल सामाजिक कार्यकर्त्याचा असेल किंवा अधिकाऱ्यांचा असेल जो कोणी विकासाला बाधा निर्माण करेल त्याला कायदेशीर प्रत्युत्तर दिले जाईल कोणालाही माफ केले जाणार नाही असे देखील त्यांनी आढावा बैठकीनंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेत स्पष्ट केले. पुढे बोलताना ते म्हणाले, बीड जिल्हयांच्या सर्वांगिण विकासासाठी प्रशासन, लोकप्रतिनिधी व सर्व मिळून काम करू, विमानतळ, रेल्वे तसेच महत्वाच्या प्रलंबित कामांना गती देण्यासोबतच विकासकामासाठी निधी कमी पडू देणार नाही, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयात उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित दादा पवार यांनी आढावा घेतला. यावेळी पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे, सर्वश्री आमदार सतिष चव्हाण, विक्रम काळे, प्रकाश सोळंके, सुरेश धस, संदीप क्षीरसागर, विजयसिंह पंडीत, उपमुख्यमंत्री यांचे सचिव राजेश देशमुख, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हा पोलीस अधिक्षक नवनीत कॉंवत,

(उर्वरीत पान २ वर)

## जिल्ह्यात विजेच्या कडकडाटासह पाऊस व वादळी वारे वाहण्याची शक्यता

### नागरिकांनी सावधगिरी बाळगावी

प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी दि. ०२ एप्रिल २०२५ रोजी दुपारी १३:३८ वाजता दिलेल्या सूचनेनुसार बीड जिल्ह्यासाठी दि. २ एप्रिल २०२५ ह्या दिवसासाठी ऑरेंज व ३ एप्रिल २०२५ ह्या दिवसासाठी यलो अलर्ट जारी केलेला आहे. दि. २ एप्रिल २०२५ रोजी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ५० ते ६० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह गारपीट होण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. दि. ०३ एप्रिल २०२५ रोजी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ४० ते ५० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा व नागरिकांनी काळजी घ्यावी.

या गोष्टी करा – विजेच्या गडगडाटासह पावसाची पूर्वकल्पना असल्याने बाहेर जाणे टाळा. जर मोकळ्या जागेत असाल आणि जवळपास कुठल्याही सुरक्षित इमारतीचा आसरा नसेल तर सखल जागेत जाऊन गुडघ्यात डोके घालून बसा. आकाशात विजा चमकत असल्यास घरात किंवा सुरक्षित इमारतीत आश्रय घ्या. घराच्या बाल्कनी, छत अथवा घराबाहेरील ओट्यावर थांबू नका. आपण घरात असाल आणि घरातील विद्युत उपकरणे चालू असतील तर त्या वस्तू त्वरित बंद करा. तारांचे कुंपण, विजेचे खांब व इतर लोखंडी वस्तूंपासून दूर रहा. पाण्यात उभे असाल तर तात्काळ पाण्यातून बाहेर पडा.

या गोष्टी करु नका– आकाशात विजा चमकत असल्यास घरातील लँडलाईन फोनचा वापर करू नका. शॉवरखाली अंघोळ करू नका. घरातील बेसिनचे नळ, पाण्याची पाईपलाइन यांना स्पर्श करू नका तसेच कुठल्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नका. विजेच्या गडगडाटासह वादळी वारे चालू असताना लोखंडी धातूच्या सहाय्याने उभारलेल्या तंबूमध्ये किंवा शेडमध्ये आसरा घेऊ नका.उंच झाडाच्या खाली आसरा घेऊ नका. धातूंच्या उंच मनोऱ्याजवळ उभे टाकू नका. जर आपण घरात असाल तर उघड्या दारातून अथवा खिडकीतून वीज पडताना पाहू नका. हे बाहेर थांबण्याइतकेच धोकादायक आहे.

## ना.अजितदादांच्या बैठकीत आ.क्षीरसागरांनी मतदारसंघातील महत्वाचे प्रश्न मांडले

### प्रशासनाशी संबंधित आणि विकासाचे मुद्दे केले उपस्थित






बीड (प्रतिनिधी)

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली विविध विकास कामांची तसेच शासकीय योजनांची जिल्हास्तरीय आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवारी (दि.२) रोजी पार पडली. या बैठकीत आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड विधानसभा मतदारसंघातील महत्वाचे प्रश्न ना.अजित दादांसमोर मांडले. यासोबतच प्रशासनाच्या संबंधित असलेले अनेक मुद्दे आ.क्षीरसागर यांनी उपस्थित केले.

बीड जिल्ह्यातील विकास कामे व शासकीय योजनांची जिल्हास्तरीय आढावा बैठक बुधवारी (दि.२) रोजी ना.अजित

(उर्वरीत पान २ वर)

## शेख निजामच्या मागे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी पूर्णपणे ताकतीशी पाठीशी राहील - उपमुख्यमंत्री अजित दादा पवार



बीड (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यातील व शहरातील प्रगल्भ आणि अचूक राजकीय निर्णय घेण्याची क्षमता असलेल्या शेख निजाम यांनी शिवसेनेला सोडचिठ्ठी देऊन राष्ट्रवादीचे घड्याळ हाती बांधण्याचा निर्णय घेतला व त्यानिमित्ताने शेख निजाम यांचा पक्षप्रवेश व रमजान ईद निमित्त ईद-ए-मिलाप या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या पक्षप्रवेश व ईद-ए-मिलाप च्या कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री महाराष्ट्र

(उर्वरीत पान २ वर)

### प्रवेश झालेल्या लोकांची नावे

शेख निजाम जैनुद्दीन ,शेख अमर जैनुद्दीन, मोमीन जुबेर ,खय्युम इनामदार, पठाण चुन्नू खान, जयंत वाघ ,आजम खान, जब्बार इनामदार ,मुजफ्फर चौधरी ,शेख, नसीर, हाजी अयुब खान पठाण ,शेख हमीद पीर मोहम्मद ,सय्यद फहीम, शेख इमरान शेख अदनान जमीर इनामदार सय्यद रियाज राजे व इतर



शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

## संपादकीय

# युनूस यांची उठाठेव

भारताच्या ईशान्येकडील सातही राज्ये भूवेष्टित असून, किनारपट्टीसाठी जाण्याचा मार्ग त्यांच्याकडे नसल्याचे त्यांनी नमूद केले. ही त्यांची उठाठेव अस्थानी असली, तरी त्यात एक प्रकारे भारताला इशाराही आहे.


आर्थिक संकटांचा सामना करीत असलेल्या आपल्या देशात चिनी गुंतवणूक यावी, यासाठी त्या देशातील शिष्टमंडळाशी संवाद साधताना बांगलादेशाचे हंगामी प्रमुख डॉ. महंमद युनूस यांनी भारताच्या ईशान्येकडील राज्यांचा केलेला उल्लेख अनाठायी आणि अपरिपक्व असाच आहे. भारताच्या ईशान्येकडील सातही राज्ये भूवेष्टित असून, किनारपट्टीसाठी जाण्याचा मार्ग त्यांच्याकडे नसल्याचे त्यांनी नमूद केले. ही त्यांची उठाठेव अस्थानी असली, तरी त्यात एक प्रकारे भारताला इशाराही आहे.

ईशान्येकडील राज्यांना भलेही समुद्रकिनारा नसला, तरी ते भारताचे घटक आहेत आणि या देशाला साडेसात हजार किमीपेक्षा अधिक लांबीची किनारपट्टी असून, ती बांगलादेशाच्या किनारपट्टीहून तब्बल दहापटीने अधिक आहे. हे वास्तव असले, तरी 'सप्तभगिनी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या, ईशान्येकडील राज्यांची कोंडी करता येऊ शकते, असा इशारा युनूस यांच्या वक्तव्यातून निघतो. पश्चिम बंगालमधील सिलिगुडीचा भाग ईशान्येला उर्वरित देशाशी जोडतो.

'चिकन नेक' म्हणून ओळखला जाणारा हा भाग नेपाळ, भूतान आणि बांगलादेश यांनाही जोडणारा आहे. या 'चिकन नेक'ला म्हणूनच मोठे महत्त्व आहे. ईशान्येकडील राज्यांचे उर्वरित देशाशी असलेले दळणवळण अधिक वेगाने होण्यासाठी तेथील रेल्वे व रस्ते यांचे जाळे विस्तृत करण्यासाठीची आणि त्याचबरोबर अन्य पूरक पायाभूत सुविधा आणखी वाढविण्याची गरज युनूस यांच्या या वक्तव्याने प्रकर्षाने समोर आली आहे. चिनी उद्योगांनी बांगलादेशात यावे, यासाठीचे आवाहन करताना युनूस यांनी केलेल्या भारताच्या अंतर्गत भूगोलाच्या उल्लेखाकडे म्हणूनच सावधानतेने पाहण्याची गरज आहे.

गेल्या ऑगस्टमधील विद्यार्थ्यांच्या हिंसक उठावानंतर बांगलादेशात शेख हसीना सत्ताभ्रष्ट झाल्या असल्या आणि तिथे युनूस यांच्या नेतृत्वाखाली हंगामी सरकार असले, तरी त्या देशातील उद्रेक अद्याप शमलेला नाही. तेथील अल्पसंख्याक हिंदू समाजाच्या विरोधातील हिंसाचार पुरता थांबलेला नाही. अर्थतज्ज्ञ म्हणून डॉ. युनूस यांची प्रतिमा चांगली आहे आणि बांगलादेशात त्यांनी तळागाळात कामही केलेले आहे; परंतु देशाचा प्रमुख म्हणून काम करण्याचा त्यांना अनुभव नव्हता. देशप्रमुखाची भूमिका बजावताना, देशात कायदा आणि सुव्यवस्था निर्माण करण्यात त्यांना पूर्णपणे यश आलेले नाही. बांगलादेशाची विस्कटलेली आर्थिक घडी पुन्हा बसविण्यातही त्यांना कसरत करावी लागत आहे.

आर्थिक विकासाबाबत बांगलादेशाची घोडदौड काही वर्षांपूर्वी सुरू होती. आता या दराची वेगाने घसरण होत असून, तो चार टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. परिणामी बेरोजगारी वाढते आहे आणि महागाईचा दरही गगनाला भिडतो आहे. युनूस यांच्या चीन दौऱ्याला ही पार्श्वभूमी आहे. चीनकडून सहा अब्ज डॉलर कर्ज घेतलेल्या बांगलादेशाला आणखी मदतीची अपेक्षा आहे. चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर दोन्ही देशांत नऊ करार झाले. त्यानंतर गुंतवणूकदारांशी बोलताना युनूस यांनी जिनपिंग यांना आमंत्रण दिले. चीनकडून वाढीव मदत मिळण्यासाठी काय वाट्टेल ते करू, अशी हमीच जणू त्यांनी या वेळी दिली. यातून त्यांची हतबलता दिसत असली, तरी बांगलादेशाच्या नव्या धोरणाचे सूचनही होते.



बीड : राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचा सत्कार करताना डॉ.क्षीरसागर यांच्यासह डॉ.दिपाताई क्षीरसागर, डॉ.सारिकाताई क्षीरसागर आणि पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# निज़ाम यांचा शिवसेनेने सन्मान राखला त्यांच्याकडे त्याग, संयम, स्थिरता नाही

## जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांची खंत



बीड (प्रतिनिधी)

शिवसेना पक्ष हा निष्ठावंत शिवसैनिकांच्या ताकतीवर आज ही भक्कम टिकून आहे. इतर पक्षातून येणाऱ्यांना उद्धव साहेबांनी तेव्हढाच सन्मान दिला. बीड चे शेख निजामही याला अपवाद ठरले नाहीत. एम आय एम मधून शिवसेनेत प्रवेश केला आणि बीड शहर प्रमुख पद मिळवले. परंतु त्यांच्याकडे निष्ठावंत शिवसैनिका प्रमाणे त्याग, समर्पण, संयम व स्थिरता नही. अजितदादा यांच्या राष्ट्रवादी पक्षाने त्यांच्या सर्व अपेक्षा पूर्ण कराव्यात असा उपरोधीक टोला जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी लागवला आहे.शेख निजाम शिवसैनिक केव्हाच नव्हते. परंतु एक मुस्लिम चेहरा असल्यामुळे पक्षाने त्यांचा एका शिवसैनिका प्रमाणे सन्मान राखला. त्यांना शहर प्रमुख केले. या उलट शेख निजाम यांनी पक्षाला काय दिले असा सवाल आज शिवसैनिक करत असल्याचे उल्हास गिराम यांनी सांगितले. आज अजितदादा यांच्या राष्ट्रवादी पक्षात शेख निजाम प्रवेश करत असुन दादांनी निजाम यांच्या सर्व अपेक्ष पूर्ण कराव्यात

# देवराई वनप्रकल्पाची दुरावस्था पाहून सयाजी शिंदेकडुन तिव्र नाराजी

## वनविभागाच्या अधिकाऱ्यांना सुचना तर कायमस्वरूपी पाणी प्रश्न मिटावा यासाठी डोकेवाडा साठवण तलावातुन पाणीपुरवठ्यासाठी अंदाज पत्रक:- डॉ.गणेश ढवळे

बीड (प्रतिनिधी)

पहिले जागतिक वृक्षसंम्मेलन झालेल्या बीड तालुक्यातील पालवण येथील सह्याद्री देवराई या वनप्रकल्पाची दुरावस्था पाहुन सिने अभिनेते व देवराईचे प्रणेते सयाजी शिंदे यांनी हळहळ व्यक्त केली. देवराईच्या वनप्रकल्पातील झाडांची निगा व संगोपनाबाबत आणि वारंवार लागणाऱ्या आगीच्या अनुषंगाने वन अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. सिने अभिनेते सयाजी शिंदे यांच्या संकल्पनेतून बीड तालुक्यातील पालवण येथील डोंगरावर २०१७ साली सह्याद्री देवराई हा वनराईचा प्रकल्प उभारण्यात आला होता. वनसंवर्धनासाठी उचलण्यात आलेले हे पाऊल कौतुकाचा विषय होता. शहरापासून जवळ असल्याने बीडकर याठिकाणी सकाळी सायंकाळी फिरण्यासाठी जात होते. सुरूवातीला या प्रकल्पाकडे चांगले लक्ष दिल्याने प्रकल्प हिरवागार होता. मात्र मागील २-३ वर्षांपासून वनविभागाचे याकडे दुर्लक्ष झाले.सामाजिक कार्यकर्त्यांचा ओढा कमी झाल्याने देवराईची दुरावस्था होण्यास सुरुवात झाली. राज्यात सर्वात कमी वनक्षेत्र असलेल्या बीड जिल्ह्यात उभारलेली या वनराईचे नियोजना अभावी वाळवंट झाले. पहिले ३ वर्षे जिल्हा नियोजन योजनेंतर्गत पाण्यासाठी निधी देण्यात आला होता.त्यानंतर उद्योजक सुरेश कुटे आर्थिक अडचणीत आल्यानंतर त्यांनी प्रायोजिकत्व स्विकारलेले पाण्याचे टँकर बंद झाल्याने दिड वर्षांपासून देवराई पाण्याविना होती.




जिल्हा प्रशासनाने जिल्हा नियोजन योजनेतुन निधी द्यावा यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर व सहका-यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेशरमांची झाडांची लागवड करत लक्ष्यवेधी आंदोलन करून जिल्हा प्रशासन व वनविभागाचे लक्ष्य वेधण्याचा प्रयत्न केला होता.सह्याद्री देवराई वनप्रकल्प आगीच्या भक्ष्यस्थानी पडण्याच्या घटना वारंवार घडत असुन आठवड्यापूर्वी लागलेल्या आगीत जवळपास ५ एकरचे जंगल जळुन भस्मसात झाले होते. पिंपळ ,वड , कडुनिंब आदि वृक्ष जळुन नष्ट झाले होते.या पार्श्वभुमीवर काल दि.१ एप्रिल मंगळवार रोजी सायंकाळी सयाजी शिंदे यांनी देवराई वनप्रकल्पाला भेट देऊन पाहणी केली. यावेळी देवराई परीसरात काही अपप्रवृत्तीचे लोक येऊन दारू, सिगारेट पार्ट्या करतात हे त्या ठिकाणी पडलेल्या काडीपेट्या ,प्लास्टिकच्या बाटल्या,वेफर्स कागदावरून लक्षात आले. त्यामुळे या गोष्टीवर प्रतिबंध घालण्यात यावा.संबंधित प्रकरणी कठोर कारवाई करण्यात यावी अशा सुचना वनविभागाचे अधिकारी गर्कळ,अशोक काकडे यांच्यासह इतर वनकर्मचा-यांना केल्या.तसेच वनप्रेमी आणि बीडकरांनी देवराई वनप्रकल्प जपण्याचे आवाहन केले. यावेळी डॉ.प्रदीप शेळके, शिवराम घोडके, सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे, अभिमान खरसाडे,देवराई ट्रेकिंग ग्रुपचे सदस्य श्रीकृष्ण उबाळे,लक्ष्मण मळेकर, विलास उनवणे, राम फाळके, हरिओम क्षीरसागर यांच्या सह पर्यावरण प्रेमी नागरीक उपस्थित होते.दरवर्षी उन्हाळ्यात भेडसावणारा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी निकालात काढण्यासाठी डोकेवाडा साठवण तलावातुन पाणीपुरवठा करण्यासाठी नविन अंदाज पत्रक बनविण्यात आले असुन जिल्हा नियोजन अथवा ईतर कोणत्याही योजनेंतर्गत मंजुरी मिळावी यासाठी सयाजी शिंदे हे पालकमंत्री अजित पवार आणि पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या कडे मागणी करणार असल्याचे डॉ.प्रदिप शेळके यांनी सांगितले.



# ग्रामसमृद्धी योजना घनसावंगीत सुरू करा: नसीर शेख

घनसावंगी (प्रतिनिधी)

ग्रामसमृद्धी योजनेअंतर्गत, शेतकऱ्यांच्या हिताच्या खूप महत्त्वाच्या योजना आहेत, त्यात सिंचन विहीर, गाय गोठे हे, शेततळे इत्यादी योजना शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाचे आहेत, या योजनेचे शेतकऱ्यांना खूप गरज आहे, म्हणून, आपण ही योजना तातडीने घनसावंगी

तालुक्यामध्ये सुरू करावी अशी मागणी सिने अभिनेते नसीर शेख यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे ही योजना शेतकऱ्यांना खूप फायद्याची आहे गुरा ढोरांसाठी गोठे ही खूप गरजेचे आहे सिंचनासाठी विहीर व शेत तळे ही गरजे चे आहे म्हणून नवीन प्रस्ताव सुरू करावे अशी मागणी केली आहे येत्या ८ दिवसात जर ह्या योजना सुरू नाही केल्या तर शेतकऱ्यांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा ही देण्यात आला आहे त्यावेळी, संतोष येडे, (भीम आर्मी तालुकाध्यक्ष) सुनील भाऊ साळवे, अन्वर पठाण चेअरमन, शेख रसूल मां. सरपंच, मच्छिंद्र गायकवाड उप सरपंच, बाबासाहेब गायकवाड, रामू देवडे सारंग कुलकर्णी, दिलीप उडान गोवर्धन साबळे आदी उपस्थित होते

# सरपंच-उपसरपंच संघटनेचे अध्यक्ष कुंडलिक खांडे यांनी घेतली उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांची भेट

## अजित दादांकडून सरपंच,उपसरपंच, ग्रा.पं.सदस्यांना न्याय मिळणार

## सरपंच संघटनांच्या मागण्यांवर लवकरच निर्णय घेवू -उपमुख्यमंत्री पवार

बीड (प्रतिनिधी)

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित दादा पवार बुधवार दि.२ एप्रिल रोजी बीड जिल्ह्याच्या दौर्यावर असताना गेवराईचे लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीत सरपंच, उपसरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुंडलिक खांडे यांनी ना.पवार यांची भेट घेत संघटनेच्या वतीने विविध मागण्यांचे निवेदन दिले. या प्रसंगी सरपंच, उपसरपंच संघटनेच्या मागण्यावर आपण लवकरच सकारात्मक निर्णय घेवू असे आश्वासन ना.पवार सरपंच ,उपसरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुंडलिक खांडे यांना दिले. संघटनेचे जिल्हाध्यक्ष परमेश्वर तळेकर यांच्यासह सदस्य उपस्थित होते.सरपंच, उपसरपंच,ग्रा.पं.सदस्यांना ना.अजित दादा नक्कीच न्याय देतील असा विश्वास कुंडलिक खांडे यांनी व्यक्त केला.



उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना दिलेल्या निवेदनात संघटनेचे संस्थापक कुंडलिक खांडे यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्रातील सरपंचांना संरक्षण मिळण्यासाठी संरक्षण कायदा बनवण्यात यावा,सरपंचांना १० ते १२हजार रुपये व सदस्यांना ५ हजार रुपये भत्ता देण्यात यावा,बीड जिल्ह्यातील मजुरांचे हजेरीपट( मस्टर )वर्षात फक्त दोन महिने चालतात वर्षभरात कमीत कमी सहा महिने तरी मजुरांचे हजेरीपट चालू राहावेत, सर्वसामान्य शेतकर्यांनी गाय गोठे, विहिरी, फळबाग सावकाराचे पैसे घेऊन बांधकाम केले आहेत त्यांचे अद्याप कुशल बिल नाही ते ताबडतोब देण्यात यावेत,खेडे गावातील पाऩंद रस्ते, सिमेंट रस्ते,खडीकरण रस्ते यांचे काम पूर्ण झाले असूनही कुशल देयके मिळत नाहीत यावर अनुदान देण्यात यावे, पाणीपुरवठ्याचे काम जलजीवन अंतर्गत पूर्ण झालेले असून अद्याप त्यांना निधी उपलब्ध झालेला नाही.अनेक गावांना निधी उपलब्ध नसल्यामुळे पाणी पुरवठ्याचे कामे अपुर्ण राहिलेली आहेत.त्यामुळे अशा गावांना पाणीपुरवठा सुरळीत नाही.तरी अपुर्ण कामांना तात्काळ निधी उपलब्ध करुन देण्यात यावा, बीड जिल्ह्यातील अनेक ग्रा.पं.ला ग्राम पंचायत कार्यालये नाहीत अशा ग्रा.पं.ला तात्काळ कार्यालय देण्यात यावे आदि मागण्या करण्यात आल्या आहेत.सरपंच,उपसरपंच संघटनेच्या या या मागण्याबद्दल आपण लवकरच सकारात्मक निर्णय घेवू असे आश्वासन ना.अजित दादा पवार यांनी दिले.

## पान १ वरून...

**सामाजिक आणि राजकीय..**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अदित्य जीवने यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

बीड जिल्हयांच्या सर्वांगिण विकासासाठी लोकप्रतिनिधी, प्रशासन व आपण सर्व नागरिक यांचा समन्वय महत्त्वाचा आहे. राज्य शासनाकडून जिल्हयातील विकासकामासाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही. अशी ग्वाही देतानाचा त्यांनी सांगितले की, अनेक वर्षापासून रेल्वेमार्गाच्या सुरू असलेल्या कामाला गती देण्यात येईल. विभागीय आयुक्त बीड रेल्वेबाबत दर महिन्याला आढावा घेतील. रेल्वे मार्गाच्या कामात कोणी अडथळा आणत असेल तर त्यांची गय केली जाणार नाही, अशा प्रकरणी थेट सरकारी कामात अडथळा आणल्याबाबतचे गुन्हे नोंदविण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

आष्टी येथील वीज उपकेंद्राच्या कामाला गती देण्याचे निर्देश देत उपमुयमंत्री श्री. पवार म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून देशात २ कोटी घरकुल देण्याची योजना आहे, त्यात राज्यात २० लाख घरकुल देण्यात येणार आहेत, बीड जिल्हयात सद्यस्थितीत ८५ हजार घरकुलाचे काम सुरू आहे, येत्या कालावधीत ७५ हजार घरकुले पुर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवून काम करूया. दिवाळी नव्या घरकुलात या उपक्रमाची सुरूवात श्री. पवार यांच्या हस्ते करण्यात आली. शासकीय निधीची वाट न पाहता घरकूल उभारणाऱ्या १० कुटुंबाचा यावेळी श्री. पवार यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

शालेय विद्यार्थ्यांसाठी जिल्हा परिषदेच्या वतीने राबविण्यात आलेल्या पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान गुणवत्ता विकास अभियान २०२५ या उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले. या उपक्रमातून शालेय विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास साधला जाणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये झालेल्या शैक्षणिक सुधारणांतून भावी पिढी चांगली तयार व्हावी, या हेतूने संपूर्ण जिल्हयात हा उपक्रम राबविण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून आवश्यक निधी देण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेच्या वतीने शिक्षक वर्गासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षण मिळावे यासाठी ३० लाख रूपयांची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. यात गरज भासल्यास सीएसआर तसेच जिल्हा वार्षिक योजनेतून निधी देण्याचीही आपली तयारी असल्याचेही त्यांनी सांगितले. शालेय परिसर संरक्षक भिंत, शौचालय, अंगणवाडी तसेच शैक्षणिक विकासाला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येणार असल्याचेही असल्याचे श्री. पवार म्हणाले.जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी यावेळी जिल्हा प्रशासनाच्या वतीने नव्याने उभारण्यात येत असलेल्या विमानतळ, रेल्वे मार्गाची स्थिती

## पान १ वरून...

तसेच सुरू असलेल्या विविध विकास कामांबाबत सादरीकरण केले.जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अदित्य जीवने, जिल्हा पोलीस अधीक्षक नववीन कॉंवत यांनीही आपल्या विभागाच्या वतीने सुरू असलेल्या कामाबाबत माहिती दिली.यावेळी विविध यंत्रणांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

**ना.अजितदादांच्या बैठकीत..**

दादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत ना.अजितदादांनी जिल्ह्यात पूर्ण झालेल्या आणि सुरू असलेल्या विकासकामांचा तसेच शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. याप्रसंगी बीड विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रतिनिधी या नात्याने आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड विधानसभा मतदारसंघातील महत्वाचे असलेले अनेक प्रश्न मंत्री महोदयांसमोर मांडले.

आ.संदीप क्षीरसागर यांनी मांडलेले मुद्दे (अतिमहत्वाचे)

एमआयडीसी भागात पोलीस चौकी उभारणी करणे. नरेगा अंतर्गत जी अनावश्यक कामे झाली आहेत त्यातील कुशलची कामे प्रमाणात झालेली नाहीत. अनावश्यक मागणी केल्याने आज रोजी जी कामे आवश्यक आहेत ती करण्यासाठी अडचण निर्माण होत आहे. राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ एफ खरवंडी ते नवगण राजुरी रस्त्यावरील मौजे नवगण राजुरी, काटवटवाडी येथील संपादित प्रकरणात सुधारित निवाडा व निधी मागणी. खरवंडी-ब्रह्मनाथ येळंब-आर्वी-खालापुरी-नवगण राजुरी राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ एफ ची सुधारणा करण्याबाबतचे काम गेल्या सात वर्षांपासून अपुर्ण आहे.बीड शहरातील जालना रोड ते छत्रपती शिवाजी महाराज चौक नाली बांधकाम करण्याबाबत मागणी केली. त्यास मा. मंत्री महोदयांनी सकारात्मकता दर्शविली.बीड नगर परिषद ने ओपन स्पेसच्या जागा अनियमितता करून बोगस वाटप केले आहेत. गुंठेवारी बोगस केलेली आहे. नगर परिषदेच्या फंडातून दुबार व निकृष्ट दर्जाची अनेक कामे केलेली आहेत. या सर्व प्रकरणातील मुळ संचीका नगर परिषद, बीड येथून गायब आहेत. तसेच नगरपरिषद प्रशासन बीड शहरातील स्वच्छता व पाणी पुरवठ्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे.

टुकूर साठवण तलावाऐवजी कोल्हापुरी बंधार्यांसाठी केली आग्रही मागणी

खाडेपारगाव येथील मंजूर टुकूर साठवण तलावाच्य ऐवजी बीड तालुक्यात प्रस्तावित ठिकाणी नऊ कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्यांना प्रशासकीय मान्यता मिळावी यासाठी आ.संदीप क्षीरसागर गेल्या अनेक काळापासून शासन, प्रशासन स्तरावर पाठपुरावा करत आहेत. बीड येथे पालकमंत्री ना. अजितदादा पवार आले असता यावेळीही याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी या भागातील नागरिकांसह आग्रही मागणी केली.

## पान १ वरून...

यावेळी परिसरातील सर्व ग्रामस्थ मंडळीच्या प्रतिनिधींसह आ.क्षीरसागरांनी ना.अजित दादांना याबाबत निवेदन दिले.

**शेख निजामच्या मागे...**

राज्य श्री अजित दादा पवार यांची प्रमुख उपस्थिती होती यावेळी प्रस्ताविक पर भाषणामध्ये शेख निजाम यांनी बीड शहरातील महत्त्वपूर्ण असलेल्या नवीन ईदगाह बालेपिर येथे सिमेंट कॉंक्रेट रस्ता व कॉंक्रिटीकरण, अल्पसंख्याक समाजातील मुलींकरिता मंजूर असलेले वस्तीग्रह च काम सुरू करणे, बीड जिल्ह्यात उर्दू घराची स्थापना करणे, इतर जिल्ह्याप्रमाणे बीड जिल्ह्यातील यूपीएसस एमपीएससीची तयारी करणाऱ्या अल्पसंख्यांक मुला मुलीं करिता स्टडी सेंटर व लायब्ररी स्थापित करणे, इस्लामपुरा ईदगाह येथे जागा अपुरी पडत असल्यामुळे बिंदुसरा नदी पात्रातील जागा उपलब्ध करून देणे, अल्पसंख्यांक बहुल भागात नियोजनबद्ध आराखडा तयार करून सदरील भागांचा नियोजनबद्ध विकास करणे आधी मागण्या उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या कडे केल्या या निमित्ताने उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी आपले मनोगत व्यक्त करताना शेख निजाम हे महत्त्वकांक्षी व्यक्तिमत्व असून त्यांनी केलेल्या मागण्या चा सकारात्मक विचार करून त्या पूर्ण करण्यात येतील त्याचा पाठपुरावा शेख निजाम यांनी करावा व या मागण्या लवकरात लवकर पूर्ण करण्यात येतील असे आश्वासन दिले व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात प्रवेश केल्याबद्दल एक निजाम व सहकार चे अभिनंदन करीत शेख निजाम सारख्या कार्यकर्त्यांची पक्षाला गरज असून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शेख निजाम यांच्या पाठीशी पूर्णपणे ताकतीशी उभी राहील असे म्हटले सदरील कार्यक्रमास मा आ. प्रकाश दादा सोळंके, मा. आ. अमरसिंह जी पंडित, आ. विजयसिंह पंडित, आ. सतीश जी चव्हाण, आ. विक्रम काळे, माजी आ. संजय दौंड जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण अँड गोरक्ष लोखंडे, राष्ट्रवादी ओबीसी सेल प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, योगेश क्षीरसागर, नारायण बप्पा शिंदे बळीराम गवते, बळी चव्हाण, प्रशिक्षित जाधव, अनुप मंत्री, संदीप पाटील, रितेश ढगे पाटील गोपाल धांडे, विजय चांदणे, सलीम शेख, समीर सय्यद, रईस चाऊस, सरपंच बिलाल पटेल, प्रज्ञाताई खोसरे, प्रियाताई डोईफोडे, शितलताई धोंडरे,लोकपत्रकार भागवत तावरे, अब्दुल वकील सर अस्लम अनवरी सर, नगरसेवक जैतुला खान, शेख इकबाल, रवीद्र कदम विनोद मुळूक, विलास विधाते, रमेश चव्हाण, सय्यद इलियास मुन्ना, इनामदार, रफिक नाशाद,यांच्या सह बीड शहरातील अनेक नगरसेवक मान्यवर व्यक्ती राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पदाधिकारी सर्वसामान्य नागरिक व महिला वर्ग मोठ्या प्रमाणात आदी उपस्थित होते

# फुकटच्या योजना बंद करा; उधळपट्टी थांबवा

## मुख्य सचिवांचा महायुती सरकारला दणका !

परभणी / प्रतिनिधी

राज्याचा अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर आर्थिक परिस्थितीचे चित्र अत्यंत स्पष्ट झाले आहे. जमा आणि खर्चाचा ताळमेळ साधणे आता कठीण होणार असल्याचे लक्षात येताच राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी परिपत्रक जारी करून महायुती सरकारला खर्चावर नियंत्रण ठेवण्याचे निर्देश जारी केले आहेत. एवढेच नव्हे तर फुकट अनुदानाच्या योजना बंद करुन केली जाणारी उधळपट्टी तात्काळ थांबवा, असा जबरी दणका राज्याच्या मुख्य सचिवांनी महायुती सरकारला दिला आहे. त्यामुळे 'लाडकी बहीण' योजनेतील वाढीव २१०० रुपये नजीकच्या काळात तरी मिळण्याची शक्यताच आता दूरावली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली डिसेंबर २०१९ मध्ये देशातील सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांची राष्ट्रीय परिषद झाली होती. त्यात मर्यादित निधीचा चांगला प्रकारे वापर करण्याबरोबरच अनुत्पादक अनुदान फुकट योजना कमी करण्याबरोबरच उत्पादक भांडवली खर्च वाढवण्याच्या सूचना दिल्या होत्या.

दरम्यान, राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या काळात महायुती सरकारने लोकप्रिय योजनांच्या घोषणा केल्या. त्यानंतर राज्याची आर्थिक परिस्थिती पूर्णपणे कोलमडून गेल्याचे चित्र निर्माण झाले आहे. आता राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा तब्बल ४५ हजार कोटी रुपये तुटीचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला. तर त्यात एक लाख ३६ हजार कोटी रुपयांची राजकोषीय तूट आहे. एकूण महसुली जमेपैकी ५७ टक्के तरतूद ही अनिवार्य बाबींसाठी खर्च करण्यात येते. त्यामुळे मुख्य सचिवांनी पंतप्रधान मोदी यांनी दिलेल्या सूचनांचे पालन करीत महायुतीच्या राज्य सरकारला आर्थिक शिस्त लावण्यासाठी चक्क परिपत्रकच जारी केले आहे.

योजनांना चाप बसणार

मंत्रिमंडळाने निर्णय घेताना आर्थिक भारामध्ये किंवा निकषामध्ये काही बदल किंवा सुधारणा सुचवल्यास त्याचे आदेश जारी



करण्यापूर्वी वित्त व नियोजन विभागाची पूर्वसहमती घ्यावी, असेही नमूद केले आहे. त्यामुळे २१०० रुपयांच्या घोषणेची अंमलबजावणी करण्यासापूर्वी सरकारला वित्त व नियोजन विभागाची सहमती घ्यावी लागणार आहे. सध्याच्या आर्थिक परिस्थितीत वित्त विभाग कोणत्याही वाढीव रकमेला तूर्त तरी हिरवा कंदिल दाखवण्याची शक्यता नाहीये. त्यामुळे महायुतीची 'लाडकी बहीण' व इतर लोकप्रिय योजनांना आता पूरता चाप बसणार हे स्पष्टपणे दिसत आहे.

पत्रकात काय नमूद केले आहे...?

जास्तीत जास्त तंत्रज्ञानाचा वापर करून अनिवार्य खर्च मर्यादित ठेवण्यासाठी जाणीवपूर्वक निर्णय घेण्यात यावा, असे राज्याच्या मुख्य सचिवांनी जारी केलेल्या परिपत्रकात नमूद केले आहे. त्यासाठी अस्तित्वात असलेल्या योजना बंद करणे अथवा एकत्रीकरण करणे आणि त्याची माहिती मंत्रिमंडळ प्रस्तावात नमूद करावी. अनिवार्य खर्चाबाबत वित्त विभागाची तसेच कार्यक्रम खर्चाबाबत नियोजन व वित्त विभागाचे अभिप्राय मंत्रिमंडळ टिप्पणीत समाविष्ट असल्याखेरीज प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात येऊ नये, अशाही खरमरीत सूचना जारी केल्या आहेत.

दरम्यान, राज्याच्या मुख्य सचिवांनी खडे बोल सुनावत दिलेल्या या आदेशामुळे फुकटात राबविले जाणाऱ्या किती व कोणत्या योजना खरोखरच बंद केल्या जातील किंवा नाही, अधोरेखित पैशाची उधळपट्टी थांबवली जाणार का नाही, हे नजिकच्या काळात दिसून येणारच आहे. पंतप्रधान मोदींच्या आदेशाचे अनुपालन म्हणून मुख्य सचिवांनी काढलेल्या आदेशाचे पालन करणार, का, महायुती सरकार तोंडावर असलेल्या महापालिका व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून मतदारांना पुन्हा एकदा गोंजारण्यासाठी मुख्य सचिवांच्या आदेशाला 'केटो' दाखवत, पंतप्रधानांचाही अवमान करणारे, हे पाहावे लागणार आहे. तद्वतच त्यासाठी विरोधकांनाही डोळ्यात तेल घालून जागता पहारा द्यावा लागेल एवढे सूचकपणे सांगावेसे वाटते.

# पत्रकार धनंजय आरबुने यांना वास्तववादी लिखाणासाठी पुरस्कार प्रदान




परळी/प्रतिनिधी

सिंदखेड राजा हे परगणा लखोजीराव जाधव यांच्या राजवाड्यासाठी प्रसिद्ध आहे. हा राजवाडा सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धात जिजाबाईंचे वडील लखुजी जाधव यांनी बांधला होता . जिजाबाईंचा जन्म १२ जानेवारी १५९८ रोजी याच ठिकाणी झाला.ख्यातनाम बहुजन साहित्य संघ, चिखलीच्या वतीने मातृतीर्थ सिंदखेडराजा नगरीतील राजे लखुजी जाधव साहित्य नगरी, येथे संपन्न झालेल्या साहित्य संमेलनात परळी येथील ज्येष्ठ पत्रकार धनंजय आरबुने यांना त्यांच्या वास्तववादी व सामाजिक लिखाणा बद्दल पुरस्कार प्रदान करण्यात आला,राजमाता जिजाऊंच्या जन्मस्थळावर प्रांत तथा जिल्ह्यातून आवर्जून उपस्थित झालेल्या साहित्यिक, कवी,आणि लेखक व रसिक माता भगिनींना सर्व मान्यवरांची मोठी उपस्थिती होती. या साहित्य संमेलनात आपल्या वैविध्यपूर्ण लेखनाने वास्तववादी विषय मांडून सामाजिक जागृती करणारे परळी येथील जेष्ठ पत्रकार धनंजय आरबुने यांना त्यांच्या लिखाणाबद्दल पुरस्कार प्रदान करण्यात आला. या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत असून विविध साहित्यिक, लेखक, पत्रकार यांनी त्यांना फोन करून तसेच प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा दिल्या

# कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडण्याच्या मागणीसाठी नागरिक आक्रमक

## वेळेत मागणी पूर्ण न झाल्यास परळी-अंबाजोगाई महामार्गावर रस्ता रोको करणार - राजेभाऊ फड

परळी ।प्रतिनिधी

उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून सूर्य आग ओकत आहे. यामुळे वातावरणातील तापमानात प्रचंड मोठ्या प्रमाणावर वाढ झाली असून जनावरांसाठी पाण्याची मोठी समस्या निर्माण होऊ लागलेली आहे. त्याचप्रमाणे काही भागातील जलस्त्रोत पातळीही खालावली असल्याने पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण होत आहे. ही बाब लक्षात घेऊन कन्हेरवाडी लघु सिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडण्यात यावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी केली आहे. यापूर्वीही प्रशासनाला मागणी करण्यात आली असून त्यावर अद्याप कोणतीही



कार्यवाही करण्यात आलेली नाही. यामुळे नागरिक संतप्त झाले असून दिनांक १० एप्रिल पर्यंत नदीपात्रात पाणी सोडले नाही तर ११ एप्रिल रोजी कन्हेरवाडी येथे गावातील सर्व ग्रामस्थ रस्ता रोको आंदोलन करतील असा तीव्र इशारा देण्यात आला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी बीडचे जिल्हाधिकारी, गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता, जिल्हा पोलिस अधीक्षक, उपविभागीय अधिकारी तथा परळी ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक यांना पत्र लिहिले असून त्याद्वारे आंदोलनाचा तीव्र इशारा देण्यात आला आहे. १० एप्रिल पर्यंत कान्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडले नाही तर ११ एप्रिल रोजी कन्हेरवाडी येथे परळी - अंबाजोगाई महामार्गावर ग्रामस्थांसह तीव्र स्वरूपाचे रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. सद्य स्थितीत निर्माण झालेली पाण्याची कमतरता आणि संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडण्यात यावे. जेणेकरून जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची समस्या दूर होईल तसेच कन्हेरवाडी गाव, जिरेवाडी, बँक कॉलनी, समता नगर, जलालपूर, शंकर - पार्वती नगर, इंदपवाडी, ब्रह्मवाडी भागातील जलस्त्रोत पातळीत वाढ होऊन याचा नागरिकांना दिलासा मिळणार आहे. करिता आपण या मागणीचा गांभीर्यपूर्वक विचार करावा आणि योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करून नदीपात्रात पाणी सोडावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी केली आहे. मागणी वेळेत पूर्ण न झाल्यास ग्रामस्थ तीव्र आंदोलन करण्याच्या पवित्र्यात असून याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनावर असेल

# सहा लाखाचा धनादेश अनादर झालेल्या प्रकरणात आरोपीची निर्दोष मुक्तता

आष्टी (प्रतिनिधी)

मौजे पिंपरखेड ता. आष्टी, जि. बीड येथील फिर्यादी मारुती निवृत्ती लाड यांनी आष्टी येथील मा. न्यायालयात धनादेश अनादर झाल्या प्रकरणी एन.आय. अँक्ट १३८ प्रमाणे मौजे देवळाली येथील आरोपी मधुकर माणिक बडे यांचे विरुद्ध फिर्याद दाखल केली होती. त्या प्रकरणात आष्टी येथील में. न्यायालय एम. के. पाटील यांनी आरोपीची निर्दोष मुक्तता केली.

या प्रकरणातील सविस्तर माहिती अशी कि, फिर्यादीने आरोपी सोबत सहकारी साखर कारखान्यास वीस पुरुष आणि महिला पुरवण्यासाठी करार केला होता. सदर करारामध्ये आरोपीने फिर्यादीस वीस पुरुष व महिला कामगार पुरवण्याच्या बदल्यात फिर्यादीने आरोपीस रक्कम रुपये सहा लाख वीस हजार रुपये दिल्याचे सदर जरामध्ये नमूद केले होते. परंतु सहकारी साखर कारखान्यास फिर्यादीस आरोपीने मजूर पुरविले नाही. त्यामुळे आरोपीने दि २८/११/२०११ रोजी रक्कम रुपये तीन लाख रुपयाचा धनादेश क्रमांक ५०१३४१ तसेच दुसरा धनादेश क्रमांक ५०१३४२ रक्कम रुपये तीन लाख असे एकूण रक्कम रुपये सहा लाख रुपयाचे दोन धनादेश दिले व उर्वरित रक्कम रुपये वीस हजार रोख स्वरूपात दिले. सदर चे धनादेश भारतीय स्टेट बँक शाखा कडा ता. आष्टी या बँकेत जमा केले असता न वटता फिर्यादीस परत मिळाले. त्यामुळे फिर्यादीने आरोपी विरुद्ध एन. आय. अँक्ट १३८ प्रमाणे फिर्याद दाखल केली होती. सदर प्रकणात फिर्यादीच्या वतीने एक साक्षीदार तपासन्यात आला. तसेच आरोपीच्या वतीने तीन साक्षीदार तपासन्यात आले. आरोपीच्या वकिलाचा युक्तिवाद ग्राह्य धरित आरोपी नामे मधुकर माणिक बडे रा. देवळाली ता. आष्टी, जि. बीड यांची रक्कम रुपये सहा लाख धनादेश अनादर प्रकरणी आष्टी येथील मे. न्यायाधीश एम. के. पाटील यांनी दि २४ /०३/ २०२५



रोजी निर्दोष मुक्तता केली. आरोपीच्या वतीने अँड. किशोर बिभीषन श्रीखंडे यांनी काम पहिले. त्यांना सहकार्य अँड. उद्धव बाबासाहेब पोकळे यांनी केले. त्यांचे अभिनंदन वकील संघांचे उपाध्यक्ष अँड. किशोर निकाळजे यांच्यासह वकील संघातील सर्व सदस्यांनी अभिनंदन केले.

# वडवणी ते थेटेगव्हण रस्त्यासाठी थेटेगव्हण फाटा येथे रास्ता रोको आंदोलन



## नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे

वडवणी/प्रतिनिधी

वडवणी ते थेटेगव्हण व चिंचवण -कोठरबन-चोरांबा या रस्त्यासाठी थेटेगव्हण फाटा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे दि.४एप्रिल २०२५शुक्रवार रोजी सकाळी १०वा.रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे तरी डोंगरपट्ट्यातील नागरिकांना या रास्तारोको आंदोलनास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात येत आहे. वडवणी ते थेटेगव्हाण व चिंचवण-कोठरबन-चोरांबा ह्या रस्ता अत्यंत खराब झाला असून या रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडले असून या रस्त्याकडे लोकप्रतिनिधीचे दुर्लक्ष असून यामुळे या डोंगरपट्ट्यातील लोकांना व वाहनधारकांना त्रास सहन करावा लागत आहे. वडवणी ते थेटेगव्हण हा रस्ता डोंगरपट्टचातील नागरीकांसाठी दळणवळणाचा आहे.व हा रस्ता वडवणी व धारुर या दोन तालुक्याला जोडणारा रस्ता आहे.आणी ह्याच रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडले असल्याने ह्या रस्त्याची दुरवस्था झाली आहे यामुळे वाहनधारकांना वाहन चालवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे.तर काही वाहनधारक तर तेलगाव मार्गे जात असल्याने त्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे.तरी शासनाचे या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी दि.४/४/२०२५ शुक्रवार रोजी सकाळी १० वा.थेटेगव्हण फाटा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे चिंचवण,पहाडी दहिफळ,पहाडी पारगाव,धुनकवाड,चारदरी व कोठारबन येथील ग्रामस्थ रास्तारोको आंदोलन करणार आहोत.तरी डोंगरपट्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात येत आहे.

# महाराष्ट्र टॅलेंट सर्च परीक्षेत राजवर्धन उगले बीड जिल्ह्यात द्वितीय तर राज्यात तेरावा

## बंटी सरच्या मार्गदर्शनात अनेक विद्यार्थी गुणवत्ता यादीत

मानूर (प्रतिनिधी)

महाराष्ट्र टॅलेंट सर्च परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून शिरूर कासार तालुक्यातील महात्मा फुले विद्यालयाचा विद्यार्थी तसेच आपले कोचिंग क्लासचे मार्गदर्शक बंटी उगलमूगले यांच्या मार्गदर्शनाखाली राजवर्धन बाळू उगले या विद्यार्थ्याने बीड जिल्ह्यात द्वितीय तर राज्यात तेरावा येऊन शिरूर तालुक्याची मान गर्वाने उंचावली असून त्याचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

मागासलेला व ऊसतोडी कामगारांचा तालुका म्हणून ओळख असणाऱ्या शिरूर कासार तालुक्याची ओळख आता हळू हळू बदलू लागली असून येथील शिक्षण स्तर गेल्या पाच दहा वर्षांपासून उंचावताना दिसत आहे.तालुक्यातून अनेक विद्यार्थी विविध स्पर्धा परीक्षेत अनपेक्षित अशी कामगिरी करत असून अनेक विद्यार्थी स्कॉलरशिप मिळवत आहेत. गेल्या पाच दहा वर्षात सुविधा नसून सुद्धा कित्येक वर्ग एक वर्ग दोनचे अधिकारी म्हणून सुद्धा तालुक्याचा बॅकलॉग भरून काढत आहेत. नुकताच महाराष्ट्र टॅलेंट सर्च परीक्षेचा निकाल लागला व आपले कोचिंग क्लासेसचे बंटी उगलमूगले सर यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले असून येथील महात्मा फुले विद्यालयाचा विद्यार्थी राजवर्धन बाळू उगले याने बीड ज़िल्ह्यात द्वितीय तर राज्यात तेरावा येण्याचा मान मिळवला आहे. त्याचे महात्मा फुले विद्यालयाचे प्राचार्य जायभाये सर, केदार सर,बडे सर, मिसाळ सर, चांदणे सर, गर्कळ सर तसेच दहिवंडी सेवा सहकारी सोसायटीचे चेरमन कचरू (बापू)आघाव, पदमश्री शब्बीर मामू,सरपंच कालिदास आघाव, उपसरपंच रवी आघाव, सुरेश धस यांचे स्वीय सहाय्यक आसाराम माने, माजी सरपंच शिलाताई आघाव,राजेंद्र आघाव, शेषेराव आघाव यांच्या सह परिसरातील नागरिकांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

महाराष्ट्र टॅलेंट सर्च परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून शिरूर कासार तालुक्यातील महात्मा फुले विद्यालयाचा विद्यार्थी तसेच आपले कोचिंग क्लासचे मार्गदर्शक बंटी उगलमूगले यांच्या मार्गदर्शनाखाली राजवर्धन बाळू उगले या विद्यार्थ्याने बीड जिल्ह्यात द्वितीय तर राज्यात तेरावा येऊन शिरूर तालुक्याची मान गर्वाने उंचावली असून त्याचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/१४६
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- १७/३/२.०२३

**नांव बदलण्याचा**
**जाहिरनामा**

**अर्जदार : कृष्णा रामदास मापारी, मिरा कृष्णा मापारी**
**प्रकरण नं - सर्वे नं ३४/२- सहन प्लॉट ४० सिटी सर्वे नं-२७५८**
**प.मि.नं- १८-१२१-४० चे हस्तातरण करणे बाबत.**

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प. मालमत्ता घर क्र. (४०) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे / जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन ( १५ ) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतु:सिमा
पुर्व - प्लॉट नंबर ४५
पश्चिम :- ९ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
दक्षिण :- नारायण मापारी यांचा प्लॉट नंबर ३९
उत्तर - प्लॉट नं.४१ व ४२

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

# सरकारकडून आंदोलन कर्त्यांची मुस्कटदाबी

## डीपीआयचे अजिंक्य चांदणे दिवसभर पोलिसांच्या नजरकैदेत अजित पवारांच्या विरोधात सामाजिक अन्याय आंदोलन

बीड (प्रतिनिधी)

शासनाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्याचे अर्थमंत्री अजित पवारांनी सामाजिक न्याय विभागाचा हक्काचा निधी इतर खात्यात वर्ग केला असून हा सामाजिक अन्याय आहे. त्याविरोधात डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाकडून बुधवार (दि.२) रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सामाजिक अन्याय आंदोलन करण्यात आले. मात्र या कालावधीत डीपीआयचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य चांदणे यांना, बीड पोलिसांनी दिवसभर नजरकैदेत ठेवले होते. सरकारकडून आंदोलन कर्त्यांची मुस्कटदाबी केली जात असून अजित पवार यांच्या विरोधात निधी चोर अशी घोषणाबाजी करण्यात आली.



राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विरोधात डीपीआयने बीड जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, समाज कल्याण विभागाचा वळविलेला निधी परत करण्यात आला पाहिजे. समाज कल्याण खात्याअंतर्गत येणाऱ्या सर्व महामंडळांना निधी उपलब्ध करुन द्यावा,तसेच लोकशाहीर आण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था आर्टी या नविन संस्थेला देखील निधी उपलब्ध करुन द्यावा, यासह विविध मागण्या निवेदनात करण्यात आलेल्या आहेत.यावेळी सुभाष लोणके, सुनिल पाटोळे, नवनाथ कांबळे, बप्पा सोनवणे, केशव लोंढे,राजाभाऊ खंडागळे,बाळासाहेब पोळ,उषा चव्हाण,विष्णू अवचार,अमोल सुतार,बाळासाहेब दोडके,साईनाथ आडगळे, चंद्रसेन पाटोळे,आकाश पाटोळे,सुरेश गायकवाड,विजयकुमार पारवे आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बीड जिल्हा दौरा होता. मुख्यमंत्री महोदयांनी समाज कल्याण विभागाचा निधी वळविल्याने डीपीआयकडून सामाजिक अन्याय आंदोलन पुकारण्यात आले होते.परंतू सत्तेचा गैरवापर करत बीड पोलिसांकडून अजिंक्य चांदणे यांना, दिवसभर नजरकैदेत ठेवण्यात आले होते. त्यामुळे या घटनेचा राज्यभरात निषेध नोंदविण्यात आला.



बीड - शिवसेना पक्षप्रमुख मा. उद्धवजी ठाकरे यांची मातोश्री येथे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी भेट घेतली. जिल्हाप्रमुख पदाची जी जबाबदारी सोपवली त्याबद्दल गिराम यांनी आभार व्यक्त केले. सततच्या दुष्काळामुळे बीड जिल्यातील शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. निवडणुकीपूर्वी कर्जमुक्तीचा नारा देणाऱ्या महायुती सरकारला जाब विचारण्यासाठी अभियान राबवणार असल्याबाबत उल्हास गिराम यांनी उद्धवजी ठाकरे यांची संमती घेतली. यावेळी संपर्क प्रमुख परशुरामजी जाधव, नवनाथ प्रभाळे, सतीशसिह परदेशीं, ज्ञानेश्वर दाभाडे सह आदी.

# द्वितीय वर्धापन दिनानिमित्त विश्व हॉस्पीटलमध्ये मेंदू मणका व नसांच्या

## आजारासाठी तसेच हाडांसाठी भव्य मोफत शिबिर

बीड (प्रतिनिधी)

येथील डॉ.विशाल पिंगळकर यांच्या विश्व हॉस्पीटलमध्ये द्वितीय वर्धापन दिनाचे निमित्त साधून संभाजीनगर येथील प्रसिद्ध एंडोस्कोपिक (दुर्बिणीद्वारे मणका शस्त्रक्रिया ) स्पाईन सर्जन (मणका विकार तज्ञ ) डॉ. गौरव चामले सर, प्रसिद्ध मेंदू विकार तज्ञ डॉ. विजय मुंडे सर , डॉ. ज्ञानेश्वर देशमुख, यांच्या सह बीड मधील प्रसिद्ध पोट विकार तज्ञ तथा माजी आयएमए अध्यक्ष डॉ अविनाश देशपांडे, प्रसिद्ध मेंदू विकार तज्ञ डॉ विशाल पिंगळकर व प्रसिद्ध हृदयरोगतज्ञ डॉ निलेश मिसाळ सर यांच्या उपस्थितीत भव्य आरोग्य शिबिर होणार आहे यावेळी हाडांची ठिसुळता (ऑस्टिओपोरोसीस) मोफत तपासणी, रक्तदाब (बीपी) मधुमेह (शुगर) न्यूरोपॅथी या तपासणी मोफत होणार आहेत तसेच इईजी (मेंदूचा आलेख ) तसेच इएमजी व एनसीऐस या स्नायूच्या तपासणी २०% सवलतीच्या दरात होणार आहेत हे आरोग्य शिबीर येत्या रविवारी दि ६ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत आयोजीत केले आहे त्याचा लाभ घेण्याचे आवाहन हॉस्पीटलच्या वतीने डॉ.विशाल पिंगळकर व हॉस्पिटलच्या सीईओ डॉ स्वप्नजा पिंगळकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

पुढे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, मेंदूचा आलेख (इईजी) ही तपासणी इतरत्र १५०० ते २००० मध्ये होते ती तपासणी २०% सवलतीच्या दरात होणार आहे तसेच, हाडाची ठिसुळता (बीएमडी) ही वयाच्या चाळीशीनतर स्त्री व पुरुष या दोघांमध्ये आढळते. हाडाची ठिसुळता म्हणजे हाडातील कॅल्शिअम कमी होवून हाडे ठिसुळ व कमकुवत बनतात आणि यामुळे पुढे वरचेवर फ्रॅक्चर व सांधेदुखीचे वयाबरोबर वाढलेले प्रमाण वाढते. स्त्रीयांना रजोनिवृत्तीनंतर वाढत्या वयाबरोबर हाडातील कॅल्शिअमचे प्रमाण ३० ते ४० टक्केपर्यंत कमी झालेले आढळते. हाडाची ठिसुळता याच्याकरिता उपचार पद्धती उपलब्ध आहेत. बाहेर इतरत्र ठिकाणी या तपासणीसाठी १५०० ते २००० रुपये खर्च येणारी ही तपासणी मोफत असून या सुवर्णसंधीचा लाभ घेवून आपल्याला भविष्यात होणार्या हाडाच्या आजारावर मात करण्यासाठी मात करण्यासाठी उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक विश्व हॉस्पीटलकडून करण्यात आले आहे. सदरील शिबिर हे विश्व हॉस्पीटल, शिवाजी नगर पोलीस स्टेशन जवळ , बार्शी रोड बीड येथे होणार आहे. अधिक माहितीसाठी ८२०८९५२४४२ / ०२४४२-२९५१५१ वर संपर्क करावा.

# पोहरागड येथील अखिल भारतीय बंजारा जनजागृती मेळाव्याला लाखोंच्या संख्येने उपस्थित रहा - विष्णु राठोड

गेवराई (प्रतिनिधी)

बंजारा समाजासह वंचित, उपेक्षित,शेतकरी, ऊसतोड कामगार बांधवांची काशी समजल्या जाणाऱ्या तीर्थक्षेत्र पोहरागड येथे दि. ५ एप्रिल, रविवार रोजी अखिल भारतीय बंजारा जनजागृती मेळाव्याचे आयोजन सर्व संत महंतांच्या व बंजारा समाजातील प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत करण्यात आले असून समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवहान बंजारा ब्रिगेडचे बीड जिल्हा प्रसिद्धी प्रमुख विष्णु राठोड सचिव यांनी केले आहे.

अखिल भारतीय बंजारा जनजागृती मेळाव्याला धर्मगुरू आमदार बाबुसिंग महाराज, महंत कबीरदास महाराज, महंत सुनील महाराज, महंत जितेंद्र महाराज, महंत रमेश महाराज,महंत शेखर महाराज, महंत यशवंत महाराज, महंत खुशाल महाराज, प्रकाश महाराज यांच्यासह भारत भरातून येणाऱ्या प्रमुख बंजारा नेत्यांची उपस्थिती राहणार आहे.

या मेळाव्याला बंजारा ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष रविकांत भाऊ राठोड, आमदार बाबुसिग महाराज, संत, महत्त,हे मार्गदर्शन करणार असून मागील अनेक वर्षापासून देशपातळीवरील अनेक समस्यांना बंजारा समाज तोंड देत असून त्याकडे शासन प्रशासनाचे



लक्ष वेधन्यासाठी तसेच महाराष्ट्रासह आता देशपातळीवर सामाजिक एकजुटीचा निर्णय घेण्याची वेळ आली असल्याने भारतातील १५ कोटी बंजारा समाजाची काशी असलेल्या पोहरागड येथे अखिल भारतीय बंजारा जनजागृती मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले असून या ठिकाणी महाराष्ट्रासह १३ ते १४ राज्यातील बंजारा बांधवांची उपस्थिती राहणार आहे.

या अभूतपूर्व ऐतिहासिक मेळाव्याचे साक्षीदार होण्यासाठी महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यातील बंजारा समाज बांधवांनी लाखोंच्या संख्येने या जनजागृती मेळाव्याला उपस्थित राहण्याचे आवाहन बंजारा ब्रिगेडचे बीडचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख विष्णु राठोड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# भालगाव येथे श्री गणपती मंदिराची प्राणप्रतिष्ठा महोत्सवानिमित्त शिवपुराण कथेचे आयोजन

ताड हादगांव (प्रतिनिधी)

भालगाव येथे गुरुवर्य ह.भ.प महंत श्री १००८ ब्रह्मलीन कार्तिक स्वामी भारती बाबा यांच्या आशीर्वादाने व वनारशी संस्थांचे मठाधिपती महंत श्री १००८ स्वामी संबीत भारती बाबा यांच्या प्रमुख उपस्थितीत व समस्त गावकऱ्यांच्या सहकार्याने श्री गणपती प्राणप्रतिष्ठा महोत्सवानिमित्त ह.भ.प.अर्जुन महाराज चौरे यांच्या अमृततुल्य वाणीतून तीन दिवसीय शिवपुराणकथेचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले होते. दिनांक-३१ सोमवार रोजी श्री. ह.भ.प.प्रभाकर महाराज मुळे दिनांक-०१ मंगळवार रोजी बालकीर्तनकार ह.भ.प. प्रथमेश महाराज चौरे, दिनांक-०२ बुधवार रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत श्री. ह.भ.प.कृष्णा महाराज नवले (श्री.क्षेत्र पैठण) यांच्या अमृततुल्य वाणीतून काल्याचे किर्तन झाले असून गावातून श्रीची टाळ मृदुंगाच्या घोषात भव्य मिरवणूक काढण्यात आली असून गावात आकर्षक रांगोळी काढण्यात आल्या होत्या. या मिरवणुकीत गावातील भजनी मंडळी, बालगोपाळ, महिला भगिनी, व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पीएम श्री जि.प प्रशाला शहागड येथे मोफत आरोग्य तपासणी

## शहागड पीएम श्री जि.प प्रशाला शाळेत विद्यार्थीची केली मोफत आरोग्य तपासणी ;वैद्यकिय उपचार आवश्यक असलेल्या विद्यार्थ्यांना आरोग्यसेवा

अंबड (प्रतिनिधी)

अंबड तालुक्यातील शहागड येथील पीएम श्री जि.प प्रशाला शाळेतील पाचवी ते नव्वीच्या विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. शहागड प्राथमिक आरोग्य केंद्र याच्या सहकार्याने या शिबिराचे आयोजन केले होते. शाळेचे मुख्याध्यापक वाहुळे सी.आर यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर घेण्यात आले.पीएम श्री योजने अंतर्गत विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी बुधवार दिनांक २ एप्रिल २०२५ रोजी करण्यात आली. शरीराची प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी विविध कडधान्ये, फळे, डाळी, भाजीपाला असा सर्वसमावेशक आहार घ्यावा असे आवाहन वैद्यकीय टीम मार्फत करण्यात आले. वैद्यकीय उपचार आवश्यक असलेल्या विद्यार्थ्यांना आरोग्यसेवा देण्यासाठी संदर्भित करण्यात आले. यावेळी वैद्यकीय पथकामध्ये शहागड प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.वैष्णवी नरवडे,आरोग्य सहाय्यीका एम.डी शिंदे,




आरोग्य सहायक जि.आर माने,लॅब टेक्नीशियन एकनाथ चोरमले, आरोग्य सेविका हारके एस.आर,एन.व्ही सोर, घोरतळे,गरगडे होते यावेळी शालेय व्यवस्थापण समिती अध्यक्ष अशफाक शाह, उपाध्यक्ष भगवान माने, सदस्य यासर तांबोळी, अख्तर काझी, लक्ष्मण उधे, रिजवान शाह,मुख्याध्यापक वाहुळे सी.आर ,भारत खेडकर,बाळा पानसरे,दिपाली जोशी,अमित कांबळे, राजेंद्र मनोर, महारूद्र सोलनकर, विठ्ठल वाघमारे, संदीप नरसाळे, रितेश दरगुडे, वैभव सावंत,श्रद्धा डाके,राधाकिसन गव्हारे व पाचवी ते नव्वीचे विद्यार्थी उपस्थित होते.

# डॉ. ज्योती ढगे बनल्या मराठवाड्यातील पहिल्या महिला डीएम निओनेटोलॉजिस्ट

बीड (प्रतिनिधी)

येथील डॉ. ज्योती मोरे-ढगे यांनी बालरोग विषयातील डीएम निओनेटॉलॉजी ही सुपर-स्पेशालिटी पदवी यशस्वीरित्या प्राप्त केली आहे. त्या मराठवाड्यातील पहिल्या महिला डीएम निओनेटोलॉजिस्ट ठरल्या आहेत. नवजात शिशूंसाठी अत्याधुनिक उपचार व संशोधन क्षेत्रात त्यांनी मिळवलेले हे यश म्हणजे केवळ शैक्षणिक उत्कृष्टता नसून, नवजात शिशूंच्या उत्तम आरोग्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

डॉ. ज्योती ढगे यांचा शिक्षणातील प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. त्यांनी प्राथमिक व माध्यमिक शिक्षण जोगे श्वरीच्या महाविद्यालय, अंबेजोगाई येथे पूर्ण केले. त्यानंतर उच्च माध्यमिक शिक्षण दयानंद कॉलेज, लातूर येथे पूर्ण केले. स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई येथून वैद्यकीय पदवी मिळवली. पुढे त्यांनी डीएनबी पेडिएॅट्रिक्स हैदराबाद येथे पूर्ण केले. नवजात शिशूंच्या उपचारात विशेष प्राविण्य मिळवण्यासाठी त्यांनी डीएम निओनेटॉलॉजी जयपूर, राजस्थान येथे यशस्वीरित्या पूर्ण केले. त्यांच्या या



प्रवासात त्यांनी वैद्यकीय क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

या अद्वितीय यशामध्ये त्यांच्या कुटुंबियांचे मार्गदर्शन आणि पाठिंबा मोलाचा ठरला आहे. त्यांचे पती डॉ. कालिदास ढगे, बालरोग तज्ज्ञ व नवजातशिशु रोग तज्ज्ञ यांनी त्यांना लग्नानंतर ही अखंड मार्गदर्शन आणि प्रेरणा दिली. तसेच त्यांचे दीर डॉ. प्रविण ढगे, माऊली डेंटल हॉस्पिटल, बीड आणि डॉ. किरण सवासे, जीवनज्योत हॉस्पिटल, बीड यांनी त्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक वाटचालीसाठी महत्त्वपूर्ण पाठिंबा व मार्गदर्शन दिले. त्यांचे सासरे रोहिदास ढगे आणि सासू श्रीमती मदालसा ढगे यांनी त्यांना प्रोत्साहित करून त्यांच्या स्वप्नांना उंच भरारी देण्याचे बळ दिले.

# श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ संस्थान भालगाव येथे त्रितपपूर्ती भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह

बीड (प्रतिनिधी)

श्रीक्षेत्र मायंबा, विठ्ठल रुखमाई संस्थान भालगाव येथे संस्थानचे प्रथम महंत ह.भ.प. वै.गोपीनाथ महाराज आंधळे यांनी प्रारंभ केलेल्या नाम सप्ताहाचा त्रितपपूर्ती सोहळा ह.भ.प. न्या. नामदेव महाराज शास्त्री श्रीक्षेत्र भगवानगड यांच्या अध्यक्षतेखाली वै. स्वामी निगमानंद महाराज श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथगड निमगाव यांच्या आशीर्वादाने तसेच संस्थानचे विद्यमान महंत ह.भ.प. नवनाथ महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाने अखंड हरिनाम सप्ताह प्रारंभ ३ एप्रिल ते सांगता १० एप्रिल २०२५ या कालावधीमध्ये संपन्न होत आहे .या नामसप्ताहामध्ये दैनिक कार्यक्रमासह सायंकाळी ९.०० ते ११.०० महाराष्टातील नामवंत कीर्तनकारांचे कीर्तन होणार आहेत .३ एप्रिल रोजी ह.भ.प. महामंडलेश्वर अमृत महाराज जोशी बीड, दिनांक ४ एप्रिल रोजी ह.भ.प. विनोदाचार्य शिवा महाराज बावस्कर वाशिम, दि. ५ एप्रिल रोजी ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज जळकीकर, दि ६ एप्रिल रोजी रामनवमीनिमित्त सकाळी १०.०० ते १२.०० वाजता ह.भ.प. काशिनाथ महाराज शास्त्री, भगवानगड व संध्याकाळी ह.भ.प. विनोदाचार्य ज्ञानेश्वर महाराज तांबे नेवासा, दि. ७ एप्रिल रोजी ह.भ.प. समाधान महाराज शर्मा, केज, दि.८ एप्रिल २०२५ रोजी



ह.भ.प. समाजभूषण शालिनीताई इंदुरीकर संगमनेर, दि. ९ एप्रिल रोजी ह.भ.प. दयानंद महाराज कोरेगावकर. तसेच ह.भ.प. लक्ष्मण महाराज शिरपे यांचे दररोज १.००ते ४.०० गीत रामायण होईल गुरुवार दि. १० एप्रिल २०२५ रोजी सकाळी काशी विश्वनाथ , प्रयागराज , अयोध्या येथून आणलेल्या कावडीच्या पाण्याने श्री मच्छिंद्रनाथांना पाण्याचा अभिषेक करण्यात येईल. नंतर ११.०० ते १.०० या वेळेत ह.भ.प. महंत नवनाथ महाराज शास्त्री श्रीक्षेत्र मायंबा विठ्ठल रुखमाई संस्थान भालगाव यांचे अमृततुल्य असे काल्याचे किर्तन होईल. परिसरातील भाविकांनी या कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन ह.भ.प. नवनाथ महाराज शास्त्री व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे

# मच्छिंद्रगडाच्या नारळी सप्ताहाचा नांदेवाली येथे हजारो भाविकांच्या उपस्थितीत पुष्पवृष्टी

गावाला पंढरपूर अवतारले!

मानूर (प्रतिनिधी)

मच्छिंद्रगडाचा ४७ वा वार्षिक फिरता नारळी सप्ताह मच्छिंद्रगडाचे मठाधिपती महंत जनार्दन महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या भक्तिभावाने सुरू झाला. बुधवार (ता.२) रोजी नांदेवाली येथे हजारो भाविक, भक्तगण आणि साधुसंतांच्या उपस्थितीत पुष्पवृष्टी सोहळ्याने या पवित्र सप्ताहाची सुरुवात झाली. संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला, तर ग्रामस्थांनी ब्रम्हवृंद आणि साधुसंतांचे जल्लोषात स्वागत केले.

मच्छिंद्रगडावरून महंत जनार्दन महाराज, महंत रामेश्वर महाराज ब्रम्हणाथ येळंब, महंत उद्धव महाराज नारायणवाडीकर यांचा भव्य रथात आगमन सोहळा मोठ्या थाटात पार पडला. डोल-ताशांच्या गजरात, टाळ-मृदंगाच्या निनादात आणि फटाक्यांच्या आतिषबाजीत निगमानंद महाराज व मच्छिंद्रनाथाच्या जयघोषात ही भव्यदिव्य मिरवणूक निघाली. कलशधारी महिला, लहान-थोर भाविक आणि वारकरी संप्रदायाने या सोहळ्यात सहभागी होत तीन किलोमीटर अंतर पार करून नांदेवालीतील ब्रम्हलीन संत निगमानंद महाराज मंदिर प्रवेश करत. येथे मंदिरातील मूर्तीला पुष्पहार अर्पण करून गावप्रदक्षिणा करण्यात आली आणि बांबाचे सप्ताह स्थळी दहा जिसीपी च्या साहाय्याने भव्य पुष्पवृष्टी करण्यात आली.नारळी सप्ताहाच्या निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. हरिपाठ, प्रवचन, भजन, कीर्तन, अखंड अन्नदान, यांसारख्या कार्यक्रमांनी संपूर्ण सप्ताह आध्यात्मिक वातावरणाने भारलेला आहे. गावातील समित्यांनी आणि ग्रामस्थांनी भाविकांच्या सोयीसाठी विशेष व्यवस्था केली आहे. आलेल्या भक्तगणांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला असून, वारकरी संप्रदायाच्या भक्तिरसपूर्ण गायनाने सप्ताहाला भक्तिमय रंग चढवला आहे. विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट व्याख्यान सादर केले, तसेच स्वागत गीताने सोहळ्याची शोभा वाढवली.



या सप्ताहाला महंत जनार्दन महाराज (मच्छिंद्रगड), महंत रामेश्वर महाराज शास्त्री (ब्रम्हणाथ येळंब), महंत उद्धव महाराज (नारायणवाडीकर), तीर्थराज महाराज पठाडे, हनुमान चैतन्य महाराज, यशवंत महाराज शास्त्री, संभाजी महाराज, महेश महाराज शास्त्री, अंगद महाराज पाटील, नंदकिशोर महाराज बोधेगाव यांसह ब्रम्हवृंद आणि असंख्य भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.मच्छिंद्रगडाच्या नारळी सप्ताहाची ही पवित्र परंपरा अखंड सुरू असून, यंदाही भव्य स्वरूपात भक्तांच्या उत्साहात पार पडत आहे.सप्ताहाचे प्रास्ताविक सुत्रसंचालन नारायन पाटील देवकर यांनी उत्कृष्ट दर्जेदार केले.या सप्ताहास सर्व स्तरातून नागरिक भाविक भक्तगण हजारो संख्येने उपस्थित होते तसेच पत्रकार गोरख खेडकर, डिगांबर गायकवाड, शंकर भालेकर, जालींदर ननवरे, चंद्रकांत राजहंस, तुकाराम धस आवर्जून उपस्थित होते.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# आदित्य शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुभाषचंद्र सारडा यांच्या वाढदिवसानिमित्त ३४० जणांचे रक्तदान

## जिल्हारूग्णालयात रक्ताचा तुटवडा असतांना रक्तदानांचा उपक्रम अत्यंत स्तुत्य

प्रतिनिधी । बीड

आदित्य शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तसेच द्वारकादास मंत्री बँकेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात आले. या रक्तदानाच्या उपक्रमाला दात्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद देत तब्बल ३४० जणांनी रक्तदान केले त्यामध्ये ९५ महिला २४५ पुरुष सहभागी झाले होते . जिल्हारूग्णालयात रक्ताचा तुटवडा निर्माण झाल्यानंतर आदित्य शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तसेच द्वारकादास मंत्री बँकेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा यांच्या वाढदिवसानिमित्त राबवलेल्या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतूक होत आहे.

आदित्य शिक्षण संस्थेच्या वतीने सातत्याने विविध सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी नेहमीच प्रत्यनशिल असलेले संस्थापक अध्यक्ष सुभाषचंद्र सारडा यांच्या वाढदिवसानिमित्त मंगळवार १ एप्रिल रोजी शिक्षण संस्थेत आयोजित केलेल्या रक्तदान शिबिराचे उद्घाटन सीए. गिरिश गिल्डा यांच्या हस्ते करण्यात आले.




### रक्तदान करणे ही सामाजिक बांधिलकी

रक्तदान करणे हे आपले कर्तव्य आणि त्याचबरोबर सामाजिक बांधिलकी देखील आहे. आपण केलेल्या रक्तातून एखाद्या रुग्णाचा जीव वाचवणे यासारखे दुसरे पुण्य नाही. अचानक होणाऱ्या अपघातामध्ये गंभीर जखमी रुग्णांवर तातडीने शस्त्रक्रिया करावी लागते. त्यावेळी रक्ताची अवश्यकता असते. यासाठी रक्त पेढी शिवाय दुसरा पर्याय नसतो. मात्र काही दिवसापासून बहुतांश रक्त पेढ्या कडे आवश्यक असणारा रक्त साठा शिल्लक राहत नसल्यामुळे त्याची चिंता वाढलेली आहे. त्यामुळे पुढील काळात रक्तदानाची चळवळ व्याप्ती वाढवणे गरजेचे आहे.
-डॉ. आदिती सरडा, संचालिका

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाला डॉक्टर हिमांशू श्रीवास्तव, डॉ. विवेक कुलकर्णी, डॉ. कल्याण अपेट, शाम भुतडा, डॉ. सतीश कचरे, डॉ. अमोल सानप, डॉ. बालाजी बहिरवाल, डॉक्टर विकास गर्जे यांच्यासह असंख्य लोक उपस्थिती होते.शिबिरात सहभागी झालेल्या रक्तदात्यांना प्रमाणपत्र व अल्पोपाहार देण्यात आला. रक्तसाठ्याची गरज लक्षात घेऊन भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन करण्याचा मानस आयोजकांनी व्यक्त केला. रक्तदान हा समाजासाठी एक प्रकारचे अमूल्य योगदान आहे. रक्तदान करून आपण कोणाच्यातरी जीवनरक्षणासाठी मदत करू शकतो. त्यामुळे प्रत्येकाने स्वतःहून पुढे येऊन रक्तदान करावे आणि या महान कार्यात आपला सहभाग नोंदवावा. 'रक्तदान, जीवनदान' ही संकल्पना आचरणात आणल्यास समाज निरोगी आणि सक्षम होईल. असे प्रतिपादन सीए. गिरिश गिल्डा यांनी व्यक्त केले.

# आद्य वचनकार लिंगायत हटगर कोष्टी समाज कुलगुरू श्री श्री श्री देवरदासी मैया यांची १०४६ वी जयंती उत्साहात साजरी

अंबाजोगाई/प्रतिनिधी

आद्य वचनकार लिंगायत हटगर कोष्टी समाज कुलगुरू श्री श्री श्री देवरदासी मैया यांची १०४६ वी जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली. हा भव्य सोहळा श्री रामलिंग चौंडेश्वरी व नवनाथ महाराज मंदिर (गढीवर), कोष्टी गल्ली, अंबाजोगाई येथे संपन्न झाला. कार्यक्रमाच्या प्रारंभी माता चौंडेश्वरी देवी व आद्य वचनकार लिंगायत हटगर कोष्टी समाज कुलगुरू श्री श्री श्री देवरदासी मैया यांची सौ. सीमा प्रदीप वरवटकर महिलाअध्यक्ष महाराष्ट्र राज्य लिंगायत हडगार कोष्टी समाज संस्था महाराष्ट्र राज्य, शाखा अंबाजोगाई यांच्या हस्ते विधीवत पूजन करण्यात आले. या पावन सोहळ्यात समाजातील असंख्य बंधू-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या श्रद्धेचा आणि एकात्मतेचा ठेवा जपला. विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांच्या माध्यमातून श्री देवरदासी मैया यांच्या विचारांचा आणि शिकवणीचा महिमा उलगडण्यात आला.



यावेळी विविध मान्यवरांनी समाज एकता, आध्यात्मिक विचारधारा आणि संस्कृतीच्या जतनाचे महत्त्व यावर प्रकाश टाकला. जयंती उत्सवाने समाजामध्ये नवचैतन्य निर्माण करत, भक्तिभाव आणि प्रेरणादायी विचारांची जागृती घडवली.यावेळी सिमा शेंगोळे,मीराताई मसनाळे,रूक्मिणबाई रूघे, संजीवनी शेंगोळे, अरूणा हरदास,अंजली उमराणे,किशोरी शेंगोळे,श्रद्धा मसनाळे यांच्यासह अंबाजोगाई लिंगायत हडगार कोष्टी समाज संस्था शाखा अंबाजोगाई चे अध्यक्ष नरसिंह कानडे,शुभंम मसनाळे,गणेश कानडे,राजेंद्र हाट्टे,विलास द्रुकर,संतराम घोळक, नारायण कानडे विष्णु मसनाळे,दिवाकर मसनाळे हनुमंतराव चौधरी ,सुनिल शेंगोळे देवराव हरदास तसेच अंबाजोगाई कोष्टी समाज अध्यक्ष नारायण हरेगावकर,महाराष्ट राज्य लिंगायत हडगार कोष्टी संस्था संचालक प्रविण उमराणे हे उपस्थित होते या कार्यक्रमास राष्ट्रीय अध्यक्ष श्री किशोर गिरवलकर यांनी उपस्थिती लावून कार्यक्रमाची शोभा वाढवली. या कार्यक्रमाचे नियोजन लिंगायत हटगर कोष्टी समाज संस्था शाखा अंबाजोगाई यांनी केले होते, या कार्यक्रमास समाज बांधव, भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# राजमाता जिजाऊ रथ यात्रा मराठा जोडो अभियान

प्रतिनिधी /जाफ्राबाद

मराठा सेवा संघ ही नोंदणीकृत सार्वजनिक संस्था असून गेल्या ३५ वर्षापासून समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी परिवर्तनवादी प्रगतशील आणि सकारात्मक कार्य करीत आहे समाजाच्या हितासाठी विविध ३३ पक्षाच्या माध्यमातून महाराष्ट्र देशात देश पातळीवर कार्यरत असलेल्या मराठा सेवा संघात संघाने अनेक ऐतिहासिक उपक्रम राबवलेले आहे त्यापैकी एक राजमाता जिजाऊ रथ यात्रा मराठा जोडू अभियान या मोहिमेअंतर्गत जाफ्राबाद तालुक्यातील जानेफळ पंडित या गावातील पंडित दांपत्य यांच्या मार्फत जाणेफळ पंडित फाटा येथे जिजाऊ रथ यात्रा या ठिकाणी राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन अंकुश पंडित तथा स्वाती पंडित यांच्या हस्ते जानेफळ पंडित फाटा येथे करण्यात आले याप्रसंगी मराठा सेवा संघाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

# श्रीक्षेत्र पोहरादेवी येथे श्रीराम नवमी यात्रा महोत्सवाच्या अनुषंगाने आढावा बैठक संपन्न

यवतमाळ ।प्रतिनिधी

श्री. क्षेत्र पोहरादेवी येथे श्रीराम नवमी यात्रा महोत्सवाच्या अनुषंगाने आढावा बैठक घेतली. या बैठकीत यात्रेच्या नियोजनासंबंधी मार्गदर्शन केले. यात्रेत सहभागी होणाऱ्या भाविकांसाठी शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, दर्शनासाठी बॅरिकेड्स, स्वच्छतागृहे, स्नानगृहे, वाहनतळ, आरोग्य पथके तसेच पूजेच्या साहित्याच्या विक्रीसाठी स्टॉल्स यांचे नियोजन कसे असावे यावर चर्चा झाली.

तसेच, भाविकांच्या सुरक्षेसाठी पोलीस प्रशासनाने आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, अशा सूचना दिल्या.सदर यात्रेला संपूर्ण महाराष्ट्रासह शेजारील राज्यांतील तीन लाखांहून अधिक भाविक दरवर्षी हजेरी लावतात. त्यामुळे स्वच्छ यात्रा, सुंदर यात्रा आणि शुद्ध यात्रा हे ब्रीद जोपासण्याबाबत निर्देश दिले. या बैठकीला वाशिम जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी श्रीमती बुवनेश्वरी एस, पोलीस अधीक्षक अनुज तारे, जिल्हा



परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती विभागाचे मुख्य अभियंता गिरीश जोशी, महंत श्री. सुनील महाराज, श्री. शेखर महाराज, संत श्री सेवालाल महाराज संस्थानचे विश्वस्त श्री. गोपाल महाराज, पोहरादेवी मंदिराचे महंत भक्तराज महाराज, श्री. जितेंद्र महाराज, विश्व हिंदू परिषदेचे श्री. राजेश्वर निवल तसेच जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# मंत्रीमंडळ बैठकीत टाकळगाव बॅरेजच्या कामास प्रशासकीय मंजुरी

## आ.विजयसिंह पंडित यांच्या पाठपुराव्याला यश

गेवराई (प्रतिनिधी)

विधानसभा निवडणुकी दरम्यान सिंदफणा नदीवरील टाकळगाव कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्याचे बॅरेजमध्ये रुपांतर करण्याचे काम करू असा शब्द जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी दिला होता. त्यांनी दिलेला शब्द खरा करून दाखविला आहे. मागील अनेक वर्षांपासून अमरसिंह पंडित आणि आमदार म्हणून निवडून आल्यानंतर विजयसिंह पंडित यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून मंत्रीमंडळ बैठकीत टाकळगाव बॅरेजच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे सिंदफणा काठावरील सिंचन क्षेत्रात भरीव वाढ होणार असल्याची माहिती



आ.विजयसिंह पंडित यांनी देवून महायुती सरकारचे त्यांनी आभार व्यक्त केले.

गेवराई सारख्या सततच्या दुष्काळग्रस्त तालुक्यात सिंचन सुविधा वाढाव्यात यासाठी जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी संधी मिळेल तेथे प्रयत्न केले. गोदावरी प्रमाणे सिंदफणा नदीपात्रात सुध्दा बारमाही पाणी असावे यासाठी त्यांनी शासन दरबारी पाठपुरावा केला. विधानसभा निवडणुकीत टाकळगाव को.प. बंधाऱ्याचे बॅरेजमध्ये रुपांतर करण्याचे आश्वासन आ.विजयसिंह पंडित यांच्या जाहिरनाम्यात देण्यात आले होते. आ.विजयसिंह पंडित यांच्या प्रयत्नांमुळे याकामी जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी नुकतीच बैठक घेऊन या कामास मंजुरी दिली होती. मंगळवार, दि.१ एप्रिल रोजी झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत टाकळगाव बॅरेजच्या कामास १९.६६ कोटी रुपये अंदाजित किंमतीसाठी राज्य शासनाने प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.टाकळगाव बॅरेजमुळे परिसरातील २९० एकर जमीन ओलिताखाली येणार आहे. टाकळगाव, हिरापूर, पिंपळगाव कानडा, औरंगपूर कुक्कडा, कोपरा, दगडगाव, पारगाव जप्ती, हिंगणी हवेली, नांदुर हवेली यांसह परिसरातील गावांच्या सिंचनासाठी या बॅरेजचा फायदा होणार आहे. बीड आणि गेवराई तालुक्यातील सिंदफणा नदीकाठच्या गावांनाही त्याचा लाभ होईल. मंत्रीमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयानंतर गेवराई विधानसभा मतदार संघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार व्यक्त केले. टाकळगाव व परिसरातील ग्रामस्थांनी आनंद व्यक्त करून आ.विजयसिंह पंडित व अमरसिंह पंडित यांचे आभार मानले.



# व्हाईस ऑफ मिडियाची वडवणी तालुका कार्यकारिणी जाहीर

वडवणी (प्रतिनिधी)

वडवणी तालुका व्हाईस ऑफ मिडियाची महत्त्वपूर्ण बैठक दिनांक ३१ मार्च २०२५ रविवार रोजी बालाजी मारगूडे, बीड जिल्हाध्यक्ष जालिंदर धांडे, संजय मालानी, दिनेश लिंबेकर, शुभम खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली व ज्येष्ठ पत्रकार सुभाषराव वाव्हळ यांच्या अध्यक्षतेखाली तसेच वडवणी तालुका पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष जानकीराम उजगरे, अध्यक्ष बाबुराव जेधे, सचिव अविनाश मुजमुले, माजी अध्यक्ष राम लंगे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली.

या बैठकीत सर्व विषयांवर सांगोपांग चर्चा करुन व्हाईस ऑफ मिडियाची वडवणी तालुक्यातील आगामी रणनीती याविषयी सविस्तर अशी चर्चा करण्यात आली. तसेच मागील वर्षीच्या कार्यकारिणीचा कालावधी संपल्याने नव्याने तालुका कार्यकारिणी गठीत करुन जाहीर करण्यात आली. यात सर्वानूमते व्हाईस ऑफ मिडियाच्या वडवणी तालुकाध्यक्षपदी जगदीश गोरे तर कार्याध्यक्षपदी सुधाकर शिंदे, उपाध्यक्षपदी सतिष वाघमारे, उपाध्यक्षपदी बप्पासाहेब भांगे, सरचिटणीसपदी शेख शरीफ, सह सरचिटणीसपदी हानुमंत मात्रे, कोषाध्यक्षपदी बबलु कदम आणि प्रसिध्दी प्रमुखपदी अतुल राऊत यांची अविरोध निवड जाहीर करण्यात आली. तर सदस्य म्हणून जानकीराम उजगरे, बाबुराव जेधे, राम लंगे, अविनाश मुजमुले, मच्छिंद्र मोरे, प्रविण नाईकवाडे, केशव लंगे, ज्ञानेश वाव्हळ यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली. याप्रसंगी सर्व नवनिर्वाचित पदाधिकारी यांचा वडवणी तालुका व्हाईस ऑफ मिडिया समितीच्या वतीने अभिनंदन सत्कार करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

# अनिलदादा जगताप यांच्या नेतृत्वाखाली भटक्या विमुक्त समाज बांधवांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश!

## सर्वसामान्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी एकनाथजी शिंदे सक्षम- आनंदजी जाधव

बीड (प्रतिनिधी)

हिंदुह्रदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन तथा महाराष्ट्रा राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते माननीय नामदार एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या नेतृवाखाली सुरु असलेल्या शिवसेनेच्या दमदार अशा कार्यपद्धतीस प्रभावित होऊन ओबीसी व्ही जे एनटी सेना महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष बाळासाहेबजी किसवे साहेब आणि शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, ओबीसी व्ही जे एनटी सेना महाराष्ट्र राज्य संपर्कप्रमुख किरण चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली तथा ओबीसी व्ही जे एनटी सेना जिल्हाप्रमुख मनोज चव्हाण यांच्या माध्यमातून शिवसेना उप नेते आनंदजी जाधव, बीड जिल्हा संपर्कप्रमुख बाप्पुसाहेब मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत भटक्या विमुक्त समाजातील आप्पा राजाराम शिंदे ,भगवान शिंदे, भारत शिंदे, प्रकाश आप्पा शिंदे, गोरखनाथ धर्मराज बाबर, सुदाम संताराम चव्हाण, कृष्णा सुदाम चव्हाण, लक्ष्मण नारायण बाबर, सागर नारायण बाबर ,अर्जुन शिंदे, सखाराम दादाराव शिंदे, नाथा सुदाम शिंदे, उत्तम आप्पा शिंदे ,सुरेश शिंदे, विजय भगवान शिंदे, लखन सुदाम चव्हाण, ज्ञानेश्वर शिंदे, बाबुराव तुकाराम बाबर, राजू पुरुषोत्तम वाघेश्वर, किरण राजू वाघेश्वरी,



करण अरुण वाघेश्वरी, नारायण गंगाराम चव्हाण, सागर शिवाजी शिंदे, ऋषिकेश बेद्रे या बांधवांनी जाहीर प्रवेश केला. दरम्यान शिवसेना उप नेते आनंदजी जाधव, जिल्हासंपर्क प्रमुख बाप्पुसाहेब मोरे यांच्यासह शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांनी भगवा झेंडा हाती देऊन भटक्या विमुक्त समाज बांधवांचे शिवसेनेत स्वागत केले. महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते बाळासाहेबांच्या विचारांचा रथ यथोचितपणे ओढत असून त्यांनी आपल्या मुख्यमंत्री काळात सामान्य जनतेसाठी अनेक हितदायी योजनांची उभारणी करत स्वतःला सिद्ध केले आहे यामुळेच बाळासाहेबांच्या विचारांचे वारसदार असणारे आपले नेते एकनाथजी शिंदे साहेब यांची ताकद वाढवण्याकरिता आपण सर्व जाती-धर्मातील कार्यकर्त्यांनी एकत्रित येऊन काम करणे गरजेचे आहे अशा भावना शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात मांडल्या तर अठरा पगड जातीची वज्रमुठ एकनाजी शिंदे साहेबांची ताकद वाढविण्यासाठी कामी येणार असल्याचे मत शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख बाप्पुसाहेब मोरे यांनी व्यक्त केले. याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्नील गलधर तथा शिवसेना, युवासेना पदाधिकारी लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्वसामान्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी एकनाथजी शिंदे सक्षम- आनंदजी जाधव

भटका विमुक्त समाज हा विकासाच्या मुख्य प्रवाहापासून अलिप्तच राहिला आहे याचे दुःख आहे. पण आता काळजी नसावी, कारण महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब सर्वसामान्य जनतेसाठी अहोरात्र झटणारे, गोरगरीब व अनाथांच्या जीवनातील आशेचा किरण आहेत. प्रखर इच्छाशक्तीने राज्याच्या प्रगतीसाठी सतत कार्यरत असलेले लोकनेते महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब अठरा पगड जातीच्या कार्यकर्त्यांना सक्षम आधार आणि ताकद देणारे नेतृत्व आहे. भटका विमुक्त समाज आता विकासापासून वंचित राहणार नाही. आम्ही सर्वजण एकत्रितपणे आपल्या समस्या अडचणी सन्माननीय शिंदे साहेबांजवळ मांडून त्या सोडवू असे शिवसेना उप नेते आनंदजी जाधव यांनी आपल्या भाषणात म्हंटले.



# धामणगाव व सांगवी पाटण येथे रमजान ईद उत्साहात साजरी

## हिंदू-मुस्लिम बांधवांनी गळा भेट करत दिल्या रमजान ईद च्या शुभेच्छा

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील धामणगाव व सांगवी पाटण येथे रमजान ईद मोठ्या उत्साहामध्ये साजरी करण्यात आली, महिनाभर निरंकार उपवास धरला जातो, आज कुटुंबामधील सर्व सदस्य नविन कपडे परिधान करून, गोड जेवण, गुलगुले, शिरखुर्मा, खाण्यासाठी घरी बोलवतात, हिंदू - मुस्लिम बांधव सर्व सण एकत्र मिळून - मिसळून साजरी करतात व गुण्या गोविंदाने राहतात. यावेळी मा. जि. प. अध्यक्ष विजय गोल्हार, धामणगाव गटाचे नेते संजय गाढवे, मा. पंचायत समिती सदस्य रावसाहेब गाढवे, मा. सरपंच सुदाम झिंजुर्के, सरपंच मनोज गाढवे, युवा नेते विजय गाढवे, मा. सरपंच अमोल चौधरी, उपसरपंच सतिश झिंजुर्के, राजू चौधरी, संजय लोखंडे, संजय तरटे, दिलीप बोराडे, सतीश गाढवे, किरण नरवडे, रखमाजी महाडिक, निलेश राऊत, हनुमंत राऊत, कांताराव लोखंडे, ए. पी. आय. साळवे साहेब, जगदाळे साहेब, केदार साहेब, डॉ. अकील सय्यद, शहाबुद्दीन सय्यद, इस्लाम सय्यद, अफसर शेख, सद्दाम शेख, बशीर शेख, इंनुस शेख, साजिद पटेल, आलिम शेख, युनुस बागवान, आमजद बागवान, बादशाह शेख, फारुख शेख, नदीम सय्यद, रफिक पठाण, दादामिया पठाण, बाबर शेख, मुन्ना सय्यद, इस्त्राईल सय्यद, सिद्धिक सय्यद, राजा पठाण, शाहरुख शेख, फिरोज शेख, अन्सार शेख व सामाजिक कार्यकर्ते समीर शेख व सर्व समाज बांधव यांनी रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या.

# दीनदयाळ नागरी सहकारी बँकेस ३१ मार्च २०२५ अखेर २ कोटी ४७ लाखांचा नफा


## दीनदयाळ बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की व उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख यांची माहिती

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

'विश्वास, विकास आणि विनम्रता' या त्रिसुत्रीनुसार कार्यरत असलेली दीनदयाळ नागरी सहकारी बँक मराठवाड्याच्या सहकार क्षेत्रात मागील २८ वर्षांत नांवारूपास आली आहे. आर्थिक क्षेत्रात वेगाने प्रगतीकडे वाटचाल करणारी बँक म्हणून ही आज दीनदयाळ बँकेकडे पाहिले जाते. सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदु मानून समाजाच्या सर्वच क्षेत्रात आर्थिकदृष्ट्या संपन्नता आणण्यासाठी दीनदयाळ बँक कटीबध्द आहे. आर्थिक क्षेत्रात आश्वासक व दमदार पाऊले टाकणाऱ्या दीनदयाळ बँकेला ३१ मार्च २०२५ अखेर २ कोटी ४७ लाख रूपयांहून अधिकचा करपूर्व नफा झाला असल्याची माहिती दीनदयाळ बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की व उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकाद्वारे दिली आहे.

दीनदयाळ बँकेची ३१ मार्च २०२५ (आर्थिक वर्ष २०२४ - २०२५) अखेर आर्थिक वर्षासाठीचे अलेखापरीक्षीत आर्थिक परिणाम सांख्यिकीय माहिती पुढीलप्रमाणे आहे (कंसातील सर्व नमुद आकडे हे कोटीत आहेत.) एकूण संकलित ठेवी (५६०.४०), कासा ठेवी प्रमाण - २७.४१ टक्के, एकूण वितरीत कर्जे (३३१.१६), एकूण गुंतवणुक (१७४.०२), भागभांडवल (१७.०३), एकूण गंगाजळी (३८.९९), निव्वळ ढोबळ मालमत्ता (५६.०२), खेळते भांडवल (६४१.१३), बँकेने एकूण (८९१.५५) एवढा व्यवसाय केला आहे. तर बँकेस तब्बल २ कोटी ४७ लाख इतका निव्वळ करपूर्व नफा झाला आहे. तर ढोबळ अनुत्पादक कर्जे (२३.७८), अनुत्पादक कर्जे (नेट एनपीए) चे प्रमाण ७.१८ टक्के एवढे आहे. आणि नक्त अनुत्पादक कर्जे १.५३ टक्के (ता.क. - वार्षिक लेखा विवरण असल्याने उपरोक्त आकडेवारीत लेखापरीक्षणाप्रमाणे अंशतः बदल संभवतो.) दीनदयाळ बँकेचे संपूर्ण महाराष्ट्र राज्य हे कार्यक्षेत्र आहे. तसेच बँकेच्या संपूर्ण महाराष्ट्रात एकूण १७ एवढ्या शाखा कार्यरत असून अंबाजोगाई येथे बँकेचे अद्ययावत मुख्य कार्यालय हे स्वतःच्या मालकीच्या भव्य इमारती मध्ये कार्यरत आहे. बँकेच्या वतीने प्रतिवर्षी युगपुरूष स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येते. मागील २३ वर्षांपासून राज्यातील व राज्याबाहेरील अनेक नामवंतांनी आपल्या अमोघ वाणीने अंबाजोगाईकरांना, ज्ञान, अध्यात्मिक, सांस्कृतिक व मनोरंजनात्मक मेजवानी दिलेली आहे. याआधी वृक्षारोपण तसेच पाणी टंचाईच्या काळात बँकेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी श्रमदानातून बंधारा बांधला आहे. मुक्या जनावरांसाठी

**दीनदयाळ नागरी सहकारी बँक, अंबाजोगाई**



ॲड.मकरंद पत्की
(अध्यक्ष)



ॲड.राजेश्वर देशमुख
(उपाध्यक्ष)

बँकेच्या वतीने पाणपोईची सुविधा करण्यात आलेली होती. मागील काही वर्षांत बँकेच्या मुख्यालयास सुप्रसिद्ध समाजसेवक, आर्थिक व व्यवस्थापन क्षेत्रातील तज्ज्ञ, सहकार आणि राजकीय क्षेत्रातील जाणकार, शिक्षण तज्ज्ञ, सिने व नाटच कलावंत, लेखक, व्याख्याते, अध्यात्मिक व धार्मिक क्षेत्रातील आदरणीय व्यक्ती, आर.बी.आय.चे वरीष्ठ अधिकारी या मान्यवरांनी वेळोवेळी बँकेस भेटी देवून आपले अभिप्राय नोंदविले आहेत. कोविड सारख्या संकटकाळात तसेच सातत्यपूर्ण सर्व ग्राहकांना दर्जेदार व तत्पर बँकिंग सेवा दिल्याबद्दल ग्राहकांच्या वतीने बँकेस वेळोवेळी लेखी प्रशंसा व गौरवपत्र प्राप्त झालेले आहेत. तसेच दीनदयाळ नागरी सहकारी बँकेच्या शिरपेचात २०२३ साली मानाचा तुरा रोवला गेला आहे. तो म्हणजे बँकेच्या सर्वांगिण कार्याची दखल घेऊन सलग दुसऱ्या वर्षी ४०० ते ५०० कोटी रूपयांच्या ठेवी जमविलेल्या गटात दीनदयाळ बँकेस 'बँको ब्ल्यू रिबन' या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने यापूर्वी गौरविण्यात आले आहे. बँकेने नेहमीच सभासद, ठेवीदार, कर्जदार, ग्राहक व हितचिंतक यांचा विश्वास संपादन केला आहे. तत्पर व दर्जेदार बँकींग सेवा, सुविधा उपलब्ध करून देत दीनदयाळ बँकेने सहकार क्षेत्रात 'बिना संस्कार, नही सहकार' हा संस्कार जोपासला आहे. एक परिवार म्हणून काम करताना 'विश्वास, विकास आणि विनम्रता' हे ब्रीद घेऊन आश्वासक प्रगती साधली आहे. सध्या बँकेच्या मराठवाड्यात अंबाजोगाई, माजलगाव, परळी वैजेनाथ., पालम, परळी रोड, नांदेड, उदगीर, लातूर, देगलूर, परतूर, धारूर, नायगांव बाजार, परभणी, छत्रपती संभाजीनगर, अहमदपूर, जालना, बीड या ठिकाणी शाखा असून सुरूवाती पासूनच सामाजिक बांधिलकी मानून ही बँक आर्थिक क्षेत्रात कार्यरत आहे. संपूर्ण संगणकीकृत बँकींग सेवा दीनदयाळ बँक पुरविते, रूपे ए.टी.एम.ची तथा युपीआयची सेवा ही उपलब्ध आहे. बँकेच्या ए.टी.एम.मशीन मध्ये इतर सर्व राष्ट्रीयकृत बँकांचे ए.टी.एम.कार्ड वापरता येतात. बँकेच्या सर्वांगीण विकासात बँकेच्या संचालिका तथा महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन, पर्यावरण आणि हवामान बदल या खात्याच्या सन्माननीय कॅबिनेट मंत्री महोदया ना.सौ.पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन तर संचालक रा.गो.धाट, संचालिका सौ.शरयुताई हेबाळकर, सर्व संचालक श्री.विजयकुमार कोपले, चैनसुख जाजु, इंजि.बिपीन क्षीरसागर, प्राचार्य किशन पवार, मकरंद कुलकर्णी, बाळासाहेब देशपांडे, डॉ.विवेक दंडे, प्रा.अशोक लोमटे, जयकरण सुरेशकांबळे, तज्ज्ञ संचालक भिमा ताम्हाणे व बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे तसेच आर.बी.आय., सहकार खात्याचे आयुक्त, तथा निबंधक, उपनिबंधक, सहायक निबंधक तसेच बँकेचे सर्व अधिकारी, शाखाधिकारी, कर्मचारी, सभासद, ठेवीदार, खातेदार, कर्जदार, हितचिंतक आदींचे सातत्यपूर्ण सहकार्य लाभत असल्याची माहिती दीनदयाळ बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की व उपाध्यक्ष ॲड.राजेश्वर देशमुख यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकाद्वारे दिली आहे. याबाबत आमच्या प्रतिनिधीशी बोलताना दीनदयाळ बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सनतकुमार बनवसकर म्हणाले की, ३१ मार्च २०२५ अखेर प्रत्येक बँकरला उत्कंठा असते ती अंतिम आर्थिक निकालाची वर्ष आलं तसं जात असतं. परंतू, वर्षभरात केलेल्या प्रयत्नांचे जणू उत्तरच मिळावे. तो आनंद, ते समाधान आणि नव्या आर्थिक वर्षाची नांदी, अशा संमिश्र भावनांची गर्दी मनात होते. पण, या भावनाच मनाला निश्चितच उभारी देऊन जातात. मार्च - २०२४ पासून ते मार्च - २०२५ पर्यंतचा कालावधी हा सर्वार्थाने नफा - तोटा पत्रकावर परिणाम करणारा होता, आपण सर्वजण हे जाणताच, त्यातही यावर्षी प्रामुख्याने ठराविक महिन्यांचा कार्यकाल, तशातच अनेक अडचणी, कर्मचाऱ्यांचे आजारपण, हे सर्व असताना ही 'प्रयत्नांती परमेश्वर' या उक्तीची अनुभूती यावी व 'टीम-वर्क' काय असते त्याचे उत्तर मिळावे. तसेच मा.संचालक मंडळाचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, कर्मचाऱ्यांचे टीमवर्क, संस्थेविषयीचे प्रेम व निष्ठा. खातेदारांचा उत्साह, सभासदांचे योगदान आहे. यामुळेच की काय या मंदीच्या कालावधीत ही बँकेने चांगला परफॉर्मन्स केला आहे. अर्थातच हे सर्व सांगण्यामागचे प्रयोजन अभिनंदन करावे हेच आहे. या सर्व अडचणींतून मार्ग काढत आमचे सहकारी, शाखाधिकारी ते सर्व शिपाई व मुख्यालयातील विभागप्रमुख व सहकारी यांचे सामुहिक प्रयास, योगदान हे या आर्थिक निकालाचे मानकरी आहेत. हे येथे निश्चितच उल्लेखनीय होय. चरितार्थ चालविण्यासाठी काम करावेच लागते, संस्थेचा उत्कर्ष हे उद्दिष्ट समोर ठेवून सातत्याने प्रयत्नरत असावे, हा आपल्या कार्यामागील प्रपंच असावा. नव्हे तोच आपल्या कार्याचा मुख्य आधार असावा. सर्वांचे हार्दिक अभिनंदन व बँकेसाठी पुढील आर्थिक वर्ष २०२५ - २०२६ हे ही उत्कृष्ट निकालाचे वर्षे ठरावे



# खोलेश्वरच्या श्रृती शिंदे ची इस्त्रो अभ्यास दौऱ्यासाठी निवड

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

येथील खोलेश्वर माध्यमिक विद्यालयातील इ.७ वी तील विद्यार्थ्यीनी कु.श्रृती बबन शिंदे हिची बेंगलोर येथील इस्त्रो केंद्रात जाणाऱ्या अभ्यास सहलीसाठी निवड झाली आहे.इस्कॉन मंदिर लातूर च्या वतीने आयोजित भगवत गीतेवरील मूल्यशिक्षण परीक्षेत श्रृतीचा बीड जिल्ह्यात सर्व प्रथम क्रमांक आल्याने तीची या अभ्यास दौऱ्यासाठी निवड करण्यात आली आहे.तिच्या या यशाबद्दल तीचे अभिनंदन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष.डॉ.सुरेंद्रजी आलूरकर,संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंतजी वैद्य,मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांतराव मुळे,खोलेश्वर शैक्षणिक संकुलातील सर्व केंद्रीय कार्यकारिणी सदस्य, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष विजयराव वालवडकर,कार्यवाह किरण कोदरकर,माध्यमिक शालेय अध्यक्ष डॉ.अतुल देशपांडे,सर्व शालेय समिती सदस्य, विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक विवेक जोशी,पर्यवेक्षक सुर्यकांत उजगरे,पर्यवेक्षक प्रशांत पिंपळे,अभ्यास पुरक मंडळ प्रमुख श्रीकांत देशपांडे,विश्वास पत्की सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# अंबाजोगाई परिसरातील मिनिबँक म्हणून ओळखल्या जाणारी

## श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्थेस मार्च २०२५ अखेर ८५.२१ लाखाचा नफा

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

ग्राहक हेच दैवत तसेच सर्वांना आपलं माननारी शहरवासीयांची मिनी बँक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्थेस मार्च २०२५ अखेर रुपये ८५.२१ लक्ष एवढा निव्वळ नफा मिळाला आहे. ग्राहकांच्या दृढ विश्वासाने ५२ कोटीच्या ठेवी मिळवत श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्थेस मार्च २०२५ अखेर ८५.२१ लक्ष रुपयांचा नफा मिळवला असल्याची माहिती पतसंस्थेचे अध्यक्ष माणिक वडवणकर, उपाध्यक्ष मनोज लखेरा आणि व्यवस्थापक गजानन कुलकर्णी यांनी दिली आहे. पतसंस्थेचे संस्थापक राजकिशोर मोदी यांचे बहुमूल्य आणि नियोजनबध्द व अभ्यासु मार्गदर्शन यांच्या बळावरच आज पतसंस्थेची यशस्वी घोडदौड सुरू असल्याची माहिती जाहीर केलेल्या प्रसिद्धी पत्रकात दिली आहे.

श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्थेची मार्च २०२५ अखेरची वित्तीय स्थिती पुढीलप्रमाणे मांडली आहे. त्यामध्ये पतसंस्थेकडे एकूण २२५१ एवढे सभासद असून, पतसंस्थेचे एकूण भाग भांडवल रुपये ३ कोटी एवढे आहे . पतसंस्थेचा स्वनिधीं हा रुपये ६.३५ कोटी एवढा असून पतसंस्थेकडे सभासदांच्या तसेच ग्राहकांच्या एकूण ठेवी रुपये ५२ कोटी एवढ्या आहेत. तर सभासद व ग्राहकांना मार्च २०२५ अखेर पर्यंत कर्ज वाटप रुपये ४५ कोटी एवढे करण्यात आले असून पतसंस्थेची अंबाजोगाई पिपल्स बँक व अन्य ठिकाणची गुंतवणूक ही रुपये २५ .४८ कोटी एवढी असून ३१ मार्च २०२५ अखेर(आर्थिक वर्ष २०२४- २०२५) पतसंस्थेस रुपये ८५.२१ लक्ष रुपयांचा निव्वळ नफा झाला असल्याची माहिती पतसंस्थेचे अध्यक्ष माणिक वडवनकर यांनी दिली आहे.

श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्था ही साधारणपणे पस्तीस वर्षापूर्वी एका छोट्याश्या खोलीत केवळ १० हजार रुपयांच्या गुंतवणुकीवर चालू करण्यात आली होती . पतसंस्थेच्या काटेकोर नियोजन , संस्थापक राजकिशोर मोदी यांचे मार्गदर्शन त्याचबरोबर सभासद , ठेवीदार व ग्राहकांच्या अतूट विश्वासाच्या बळावर श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्थेने रुपये दहा हजारावरून आज ५२ कोटीचा टप्पा गाठला आहे . पतसंस्थेने हजारो छोटे मोठे व्यवसाईक , हातगाडी, फेरीवाले, भाजीपाला व फळविक्रेत्याना आर्थिक सहाय्य करून त्यांना त्यांचा व्यवसाय वाढीसाठी मदत करून त्यांचा व त्यांच्या कुटुंबाचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी सदैव प्रयत्न केला आहे . तसेच वेळोवेळी सभासदांबरोबरच इतर ग्राहकांच्या मुलांमुलींच्या शिक्षणासाठी , लग्नासाठी , घर बांधकाम करण्यासाठी तसेच नवीन जागा खरेदी करण्यासाठी देखील पतसंस्थेकडून वेळोवेळी आर्थिक मदत केली आहे . श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्था ही वेळोवेळी अर्थार्जनासोबतच अनेक सामाजिक , शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आघाडीवर असते. पतसंस्थेच्या वतीने प्रतिवर्षी गरीब ,होतकरू व दिव्यांग विद्यार्थ्यांना मोफत गणवेश तसेच शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येत आहे. श्री योगेश्वरी नागरी पतसंस्थेची मातृबँक ही अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँक म्हणून कार्यरत आहे . श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्था ही आजच्या घडीला केवळ पतसंस्था राहिली नसून ती एक मिनी बँक म्हणूनच ओळखल्या जाऊ लागली आहे .

श्री योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्था नावारूपाला आणण्यासाठी पतसंस्थेचे सर्व ग्राहक , सभासद , ठेवीदार तसेच कर्जदार यांच्यासह संस्थापक राजकिशोर मोदी , अध्यक्ष माणिक वडवणकर , उपाध्यक्ष मनोज लखेरा , तसेच संचालक कचरूलाल सारडा, ब्रह्मचारी इंगळे , सुनील वाघाळकर , रुपेश चव्हाण , शिरीष भावठाणकार, शेख अब्दुल शेख करीम , सय्यद अमजद , कल्याणी राहुल देशपांडे , जयश्री बाळासाहेब घाडगे यांच्यासह ॲड दयानंद लोंढाळ, जावेद छोटू गवळी तसेच पतसंस्थेचे सर्व कर्मचारी व पिग्मी प्रतिनिधी यांचे मोलाचे सहकार्य लाभले असल्याचे प्रसिद्धी पत्रकात उल्लेखित केले आहे.

# जैन संघटनेच्या गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार उपक्रमास सर्वतोपरी सहकार्य करू-डॉ. पांचाळ

जालना ।प्रतिनिधी

भारतीय जैन संघटना आणि महाराष्ट्र राज्य सरकारच्या मृद व जलसंधारण विभागाच्या संयुक्त करारानुसार शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढवण्यासाठी गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार तसेच नाला खोलीकरण व रुंदीकरण या दोन महत्त्वपूर्ण योजनांना कायमस्वरूपी मंजुरी देण्यात आली आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांना जलस्रोतांचे संवर्धन करता येणार असून, शेतजमिनींची सुपिकता वाढण्यास मदत होणार असल्याने या उपक्रमास जिल्हा प्रशासनाचे सर्वतोपरी सहकार्य राहील, अशी ग्वाही जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली.

भारतीय जैन संघटनेचे संस्थापक शांतीलाल मुथा, राष्ट्रीय अध्यक्ष नंदकिशोर साकला, राष्ट्रीय सचिव दीपक चोपडा, प्रदेश अध्यक्ष केतन शाह, प्रदेश सचिव प्रवीण पारख यांच्या मार्गदर्शनाखाली जालना जिल्ह्यात या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होणार आहे. त्या अनुषंगाने भारतीय जैन संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजयकुमार जैन यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने बुधवार दि. २ एप्रिल जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांची भेट घेतली. याप्रसंगी झालेल्या बैठकीत या योजनांबाबत सविस्तर माहिती



देण्यात आली. प्रास्ताविकात रोशन रुणवाल यांनी गाळ म्हणजे काय आणि गाळ काढण्याचे नियोजन कसे करावे, यावर प्रकाश टाकला. तसेच जलजिल्हा प्रमुख दीपक मोदी यांनी योजनेच्या अंमलबजावणीची सविस्तर माहिती दिली. गाळ काढण्यासाठी अर्ज कसा भरावा, ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया कशी करावी याचेही मार्गदर्शन त्यांनी केले.

जिल्हाध्यक्ष विजयकुमार जैन यांनी ग्रामपंचायतींनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी पुढाकार घेण्याची घेण्याचे आवाहन केले. भारतीय जैन संघटना महाराष्ट्रभर या योजनेचा प्रचार व प्रसार करून शेतकऱ्यांमध्ये जागरूकता निर्माण करेल. या कार्यात स्थानिक प्रशासन, ग्रामपंचायती, सरपंच, ग्रामसेवक आणि शेतकऱ्यांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गाळयुक्त शिवारामुळे शेतजमिनी अधिक सुपीक होणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी या उपक्रमाला प्रशासनाच्यावतीने संपूर्ण सहकार्य देण्याचे आश्वासन दिले. जलसंधारण आणि मृदसंवर्धनाच्या या योजनांमुळे कृषी क्षेत्राला मोठा फायदा होईल, असेही त्यांनी सांगितले.

जैन संघटनेच्या शिष्टमंडळात जयराज सुरणा, श्रीपाल मरलेचा, राजेश लुनिया, ड. अनिल संचेती, रविंद्र संचेती, पवनराज सुराणा, संजय लव्हाडे, महावीर रुणवाल, संतोष ओस्तवाल, प्रवीण पहाडे, महावीर कटारिया, चैतन्य वायकोस, पंडित खुळे, पंकज जैन, कांतिलाल सेठिया, अजय बोरा, नरेंद्र जोगड, प्रेमचंद कासलीवाल, विजय बावीशी, जय कोटेचा, कुशल गेलडा, चेतन देसरडा, वीरेंद्र अलिझार, जिल्हा समन्वयक संदीप गवळी, विजय लोनगोरे आदी मान्यवरांचा समावेश होता. या महत्त्वपूर्ण योजनांच्या अंमलबजावणीमुळे जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांना जलस्रोतांचे संरक्षण आणि मृदसंधारणाचा लाभ होईल, असा विश्वास या वेळी व्यक्त करण्यात आला.


# बीड जिल्हा बँकेचे पालकत्व पुणे जिल्हा बँकेने स्विकारावे

## राजकिशोर मोदी यांचे उपमुख्यमंत्री मा. ना. अजितदादा पवार यांच्याकडे मागणीपर निवेदन

बीड (प्रतिनिधी)

बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे पालकत्व राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अधिपत्याखाली असलेल्या पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने स्वीकारावे अशा प्रकारची मागणी अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेचे संस्थापक अध्यक्ष तथा अंबाजोगाई नगरीचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी एका निवेदनाद्वारे अजितदादा पवार यांच्याकडे केली आहे. यावेळी त्यांच्या सोबत कापूस पणन महासंघाचे संचालक ॲड विष्णुपंत सोळंके हे होते.

मागील काही वर्षांपासून बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची आर्थिक स्थिती अतिशय डबघाईला आली आहे. त्यामुळे बँकेचे ग्राहक आणि शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. बँक आर्थिक डबघाईतून बाहेर काढून शेतकऱ्यासह अन्य ग्राहकांना त्याचा लाभ होण्यासाठी बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे पालकत्व उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या नेतृत्वाखालील असलेल्या पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने स्विकारावे, अशी मागणी राजकिशोर मोदी यांनी अजितदादा पवार यांच्याकडे केली आहे. बीड जिल्हा दौऱ्यावर असलेल्या अजितदादा पवार यांना मोदी यांनी जिल्हा बँकेच्या आर्थिक परिस्थिती बाबत अवगत केले. त्या बँकेमुळे



जिल्ह्यातील हजारो ग्राहक आर्थिक विवंचनेत सापडले आहेत. कित्येक ग्राहकांनी या आर्थिक विवंचनेतून आत्महत्या देखील केल्याचे मोदी यांनी अजितदादा यांना अवगत केले.

गेली काही काळापासून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आर्थिक परिस्थिती मुळे बँकेचे ठेवीदार, शेतकरी, छोटे व्यापारी, नोकरदार, निवृत्त कर्मचाऱ्यांचे कोट्यावधी रुपये या बँकेत अडकले आहेत. त्यामुळे त्यांचा आर्थिक व्यवहार देखील ठप्प झाल्याने येथील ग्राहकांच्या कुटुंबांवर देखील याचा विपरित असा परिणाम झाला आहे. यामुळेच पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने या बँकेचे पालकत्व स्विकारुन ही बँक आर्थिक तोट्यातून बाहेर काढावी. जेणेकरून त्याचा फायदा जिल्ह्यातील लाखो ग्राहक तसेच शेतकऱ्यांना होणार असल्याचे राजकीशोर मोदी म्हणाले. राजकिशोर मोदी यांनी बँकेविषयी केलेल्या मागणीवर गांभीर्याने विचार करू तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे (शिखर बँक) अधिकारी या बँकेत पाठवून बँकेस आर्थिक शिस्त लावण्याचा प्रयत्न करू असा सकारात्मक प्रतिसाद उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी दिल्याचे मोदी यांनी यावेळी सांगीतले.